


# कर्तव्यपूर्ती विकासाची

ग्राम उन्नतीची नवी वाट

## जलंब

ता. शेगांव, जि. बुलढाणा

















**सौ.मंगलाताई उत्तम घोपे**

कालावधी : ९ फेब्रु.२०२१ ते २७ मे २०२३

**यांच्या सरपंच पदाच्या कार्यकाळात झालेल्या कामांचा आढावा**





सौ. मंगलाताई घोपे
सरपंच



सौ. पल्लवीताई सोनटक्के
उपसरपंच

# विकासकार्याचे सहयोगी ग्रामपंचायत सदस्य, सचिव व कर्मचारी वृंद

आपले वैयक्तिक मतभेद, पक्षभेद बाजुला ठेवून जलंब गावातील विकास कार्यासाठी नेहमी सहकार्याची भूमिका निभावणारे जलंब ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, कर्मचारी वृंद यांचे जाहीर आभार. या सर्वांच्या पाठिंब्यामुळे सरपंच पदाचा कार्यकाळ पूर्णत्वास गेला व गावाचा विकास साधता आला !



श्री.महेशभाऊ गव्हांदे
उपसरपंच



सौ. आशाताई वाघोदकार
सदस्य



सौ. दुर्गाताई गव्हांदे
सदस्य



सौ.वैशालीताई हेलोडे
सदस्य



सौ. पूजाताई काळे
सदस्य



सौ. गिताताई दुटे
सदस्य



श्री.संजयभाऊ गव्हांदे
सदस्य



श्री.प्रकाशभाऊ देवचे
सदस्य



श्री.गोपालभाऊ मोहे
सदस्य



श्री.दिपकभाऊ चोपडे
सदस्य



श्री.सचिनभाऊ असंबे
सदस्य



श्री. एस. एम. काळे साहेब
ग्रामविकास अधिकारी



स्व. शिवहरीभाऊ देवचे
दिवंगत ग्रा.प. कर्मचारी



श्री. केशवराव देशमुख
ग्रा.प. कर्मचारी



श्री. सुरेशभाऊ देवचे
ग्रा.प. कर्मचारी



श्री. गणेशभाऊ देवचे
ग्रा.प. कर्मचारी



श्री. राजेशभाऊ गव्हांदे
ग्रा.प. कर्मचारी



श्री. पंकजभाऊ गव्हांदे
ग्रा.प. कर्मचारी



श्री.अक्षयभाऊ डांगे
ग्रा.प. कर्मचारी



श्री.किशोरभाऊ डोके
ग्रा.प. कर्मचारी



श्री.सचिनभाऊ सोनटक्के
"आपले सरकार" केंद्र संचालक



# सहकार्य गावकऱ्यांचे ... विकास गावाचा !

सर्व जलंब ग्रामस्थांना सप्रेम नमस्कार ! जलंब गावात ३० महिन्यांच्या कालावधीत झालेल्या कामांचा संपूर्ण तपशील देणारी " कर्तव्यपूर्ती विकासाची" ही पुस्तिका गावकऱ्यांच्या माहितीसाठी आपल्या हाती देत आहोत. देशात पंचायत राज स्थापन झाल्यापासून आपल्या जलंब गावाचे सरपंचपद अनेक प्रतिष्ठित गावकऱ्यांनी भूषविले आहे. प्रत्येक सन्माननिय सरपंचांनी गावाच्या विकासासाठी आपले योगदान दिलेले आहे.

सुरु असलेल्या पंचवार्षिक मध्ये सरपंचपदाचा पहिल्यांदाच निवडणूक लढवून ग्राम पंचायत सदस्य झालेल्या सौ. मंगलाताई उत्तम घोपे यांना प्राप्त झाला. त्यांच्या अडीच वर्षाच्या कालावधीत जलंब गावामध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामांना चालना मिळाली. पाणी पुरवठा, सिमेंट रस्ते, रस्ता खडीकरण, रुंदीकरण, ग्रा. प. मालकीच्या इमारतींचे नवीनीकरण, नाल्या, पथदिवे, सोलर, स्मशानभूमी सुधार, ग्राम स्वच्छता, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, नागरी सुविधा अशा सर्व क्षेत्रात भरीव काम करण्यात आले.

### मुबलक पाणी पुरवठा

गावकऱ्यांना पिण्याचे पाणी वेळेवर आणि पुरेश्या प्रमाणात मिळाले पाहिजे यासाठी जलजीवन योजनेतून १५ हजार फूट पाईप लाईन टाकण्यात आली. ज्यांच्याकडे नळ कनेक्शन नव्हते त्यांना मोफत नळ लावून देण्यात आले. या माध्यमातून सर्वांना नियमित पाणी मिळेल अशी व्यवस्था करण्यात आली.

जल जीवन मिशन योजने अंतर्गत फिल्टर प्लांट व पूर्णा नदीवरून गावा पर्यंत पाणी आणणे व पूर्ण गावात नियोजन करून पाईप लाईन टाकणे व येणाऱ्या काळात तिसऱ्या दिवशी पाणी देण्याचा संकल्प घेण्यात आला आहे.

भविष्यामध्ये गावकऱ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी होण्याकरिता गावामध्ये मुख्य ६इंची पाईप लाईन टाकून ठेवली. तसेच संभाव्य अडचणी लक्षात घेऊन जुनी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित ठेवली.

पिण्याच्या पाण्यामध्ये क्षारांचे प्रमाण अधिक आढळून आल्यामुळे लोकांना पिण्याचे पाणी शुद्ध मिळावे या करिता ग्रामपंचायतमध्ये आर.ओ प्लॅन्ट बसविण्यात आला व माफक दरात शुद्ध पाणी पुरविणे सुरु आहे.

### विजपुरवठा व पथदिवे

गावातील सार्वजनिक विज पुरवठ्याचे नियोजन करण्यात आले. सर्व विद्युत पोलवर नंबर टाकण्यात आले. त्यामुळे पथदिवे बंद झाल्यास नेमक्या कोणत्या ठिकाणी फॉल्ट झाला हे वीज वितरण कंपनीस तक्रारदाराला सांगता येते. गावातील सर्व मुख्य चौकांमध्ये नवीन हायमास लाईट लावण्यात आले.

### रस्ते कॉंक्रीटीकरण, दुरुस्ती, मजबुतीकरण

सर्वात महत्वाचे काम म्हणजे गावातील रस्ते सुस्थितीत आणणे. सिमेंट कॉंक्रीटीकरण, खडीकरण, मजबुतीकरण, रुंदीकरणाची कामे करून गावातील रस्ते व्यवस्थित करण्यात आले. अरुंद गल्लीमध्ये पेव्हर ब्लॉक टाकण्यात आले. सांडपाणी बाहेर येऊन रस्ता खराब होऊ नये म्हणून अंडर ग्राउंड नाल्या बांधण्यात आल्या. रस्त्यांच्या बाजूला ठिकठिकाणी सिमेंट नाल्यांचे नव्याने बांधकाम करण्यात आले. दलित व मागासवर्गीय वस्त्यांमध्ये रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्यात आले.

### ग्राम स्वच्छता अभियान

माननिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वच्छतेबाबत देशभरात जी भव्य मोहीम हातात घेतली त्याला कृतियुक्त बळ देण्यासाठी ग्राम स्वच्छतेला अधिक प्राधान्य देण्यात आले. त्यात नवीन घंटा गाडी खरेदी, घरोघरी जाऊन ओला सुका कचरा

संकलन करणे, कचऱ्याची विल्हेवाट गावाबाहेर करणे, नाल्यांची सफाई, भूमीगत गटार, नाल्यांवर धापे टाकणे अशा माध्यमातून सार्वजानिक आरोग्य जपता आले.

### स्मशानभूमी सौंदर्यीकरण

गावातील स्मशानभूमी सुधारणा समिती स्मशानभूमीचे व्यवस्थापन करीत आहे. त्या कामात ग्रामपंचायतचा सुद्धा सहभाग असावा या दृष्टीकोनातून स्मशानभूमीचे सौंदर्य वाढावे या करिता स्मशानभूमीतील जागेचे सपाटीकरणाकरिता सहकार्य केले. नियोजनबद्ध आखणी करून वृक्षारोपण केले. कचरा कुंड्यांची व्यवस्था केली, स्मशानभूमीमध्ये लोकांना बसण्याकरिता लोखंडी बेंच उपलब्ध करून दिले. दहन देण्याकरिता दुसरे टीन शेड तयार करून दिले. त्याकरिता आर्थिक सहाय्य केले. गावापासून स्मशानभूमी पर्यंत स्ट्रीट लाईटची व्यवस्था करून देण्यात आली.

### ग्रामपंचायत कार्यालय नूतनीकरण

ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत आकर्षक व प्रसन्न वातावरण निर्माण होण्याकरिता सुशोभित करण्यात आली, मासिक सभेकरिता सुसज्ज बैठक व्यवस्था करण्यात आली. सामाजिक समता प्रस्थापित राहावी, सामाजिक एकोपा, समता निर्माण होण्याकरिता सर्व संतांच्या व महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथीचे कार्यक्रम ग्राम पंचायतच्या वतीने घेण्यात येतात. महिलांचा सहभाग वाढण्या करिता "हळदी कुंकू" कार्यक्रम, महिला दिनानिमित्त उद्बोधन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दिवाळीत 'लक्ष्मीपूजन व इतर सामाजिक कार्यक्रमात महिलांना प्राधान्य देण्यात आले.

### करदात्या नागरिकांना प्रोत्साहन

करनिधी अधिक संकलन व्हावा या उद्देशाने कर भरणाऱ्यांना एक मोफत पाण्याची कॅन देऊन प्रोत्साहीत करण्यात आहे. अशा ४०० कॅनचे मोफत वाटप केले. ज्या कुटुंबामध्ये दुःखद निधन झाले त्यांना सांत्वनपर 24 कॅन मोफत शुद्ध पाणी पुरविण्याचे नियोजन केले.

### बचत गटांना बळ

नानाजी देशमुख कृषी संजिवन योजने मधून शेतकऱ्यांना लाभ मिळवून दिला. बळीराजा महिला स्वयंसहायता समूह जलंब बचत गटाला एक ट्रॅक्टर व इतर शेती उपयोगी अवजारे मिळवून दिली. तसेच कृषी क्रांती शेतकरी उत्पादक गटाला एक ट्रॅक्टर मिळवून दिला. शेतकऱ्यांना कांदाचाळ, स्प्रिंकलर सेट, मोटारपंप कीटक नाशक औषधी, पेरणीयंत्र, रोटावेटर, थ्रेशर, पलटीनीगर वगैरे साहीत्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

### गावातील विविध घटकांना सहाय्य

ग्रामपंचायतच्या निधीतून ५% निधी काढून अपंगांना संसार उपयोगी भांड्यांचे व काही अपंगांना चेक व्दारे मदत निधीचे वाटप केले. शाळेतील मुलामुलींना शाळेत जाण्याकरिता सायकलींचे वाटप केले.

कोरोना महामारीच्या काळात ग्रामपंचायतच्या कार्यालयाच्या वतीने कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचे कॅम्प घेण्यास सहकार्य केले. स्वतः उपस्थित राहून एकूण प्रत्येक शिबीर घेतले. व ९७% लसीकरणाचे काम पार पाडले. त्यामुळे जलंब गावातील कुणीही या महामारीत दगावले नाही हे विशेष.

जिल्हा परिषद मराठी प्राथमिक मुलांची शाळा व मुलींची शाळेसह अंगणवाडीतील मुले व मुलींना बसण्याकरिता फर्निचर, कपडे वाटप शैक्षणिक साहीत्याचे वाटप केले.

ग्राम पंचायतचे दिवंगत कर्मचारी स्व. शिवहरी रामचंद्र देवचे यांचे खूप सहकार्य लाभले. ग्रामपंचायत मधील सर्व रेकॉर्डची माहिती त्यांनी करून दिली. त्यांच्या आकस्मिक निधन दुःखदायी ठरले. त्यांच्या कुटुंबियांना सांत्वनपर आर्थिक मदत ग्रा.प.वतीने देण्यात आली.

# दि. ९ फेब्रुवारी २०२१ ते २७ मे २०२३ या कार्यकाळात जलंब गावात पूर्णत्वास गेलेली विविध विकासकामे

| अ. क्र. | विकासकामांचा तपशील | खर्च अंदाजे |
|---|---|---|
| 1. | ग्रामपंचायत आवारात वृक्ष लागवड. | 4000/- |
| 2. | नविन व्यायामशाळा बांधकाम | 700000/- |
| 3. | गावात कचराकुंडी बसविणे. | 16000/- |
| 4. | ग्रामपंचायतच्या वतीने 2 कचरा हातगाडी खरेदी करणे | 15000/- |
| 5. | गावातील स्वछतेसाठी दोन स्वच्छता कामगार ठेवणे | 300000/- |
| 6. | गावातील 244 स्ट्रीट लाईट पोलवर नंबर टाकणे. | 12200/- |
| 7. | गावातील नालीच्या बाजुचे गवत मजुर लावुन काढणे. | - |
| 8. | गणेश काकड ते विठ्ठल उगले घरापर्यंत पेव्हर बॉक रस्ता | 300000/- |
| 9. | श्रीराम मोहे ते अभयसिंग राजपुत रस्ता काँक्रिटीकरण. | 496000/- |
| 10. | प्रकाश काळे ते संतोष जांभे याचे घरापर्यंत कॉक्रिट रस्ता | 496000/- |
| 11. | सार्वजनिक स्वच्छतागृह बांधकाम मागासवर्गीय | 500000/- |
| 12. | युवकांसाठी व्यायाम शाळेमध्ये जिमचे सर्व प्रकारचे साधन | 500000/- |
| 13. | गावातील घराघरामध्ये जीवन ड्रॉप वाटप करणे. | 160000/- |
| 14. | 64 कोरोना लसीकरण कॅम्प आयोजीन व व्यवस्थापन | - |
| 15. | नोटरी वरूनजागेच्या देणगी मधुन नागरीकांना देण्यास ग्रा.पं.कटीबध्द | - |
| 16. | गावाच्या सुरक्षेसाठी CCTV कॅमेरे लावण्यात आले. 2 नग. | 7000/- |
| 17. | गावातील सार्जनिक ठिकाणच्या विहीरी दुरुस्ती व बांधकाम करणे.<br>1) सचिन सोनटक्के यांचे घरासमोर. 2) अनंता दोरकर यांचे घरासमोर.<br>3) बंडु गायगोळ यांचे घरासमोरील. 4) झोपडपट्टी समाज मदीर समोरी | 115000/- |
| 18. | नविन टप्पे बांधकाम करणे.<br>1) शाम चोपडे यांचे घराजवळ. 2) ईश्वरसिंग राजपुत यांचे घराजवळ.<br>3) महादेव मोहे यांचे घराजवळ, 4) नामदेव मोहे यांचे घराजवळ.<br>5) दुध डेअरीच्याबाजुला, 6) भिम नगर कमानखाली, 7) ज्ञानेश्वर मोरे यांचे घराजवळ, 8) सचिन बेलोकार यांचे घरासमोर | 105000/- |
| 19. | नाली बांधकाम करणे. बजरंग नगर | 60000/- |
| 20. | सोसायटी गोदाम जवळ सिमेंट पाईप टाकणे. 15 वित्त आयोग | 84000/- |
| 21. | मधुकर गाढे यांचे घराजवळ जे.सी.बी ने नाली काढणे | |
| 22. | सेंट्रल बँक जवळील लोखंडी गेट बसविणे व दुरूस्ती करणे | 20000/- |
| 23. | जलंब गावातील नाली सफाई करणे.<br>1) बस स्टॅन्ड पासुन ते जुना बस स्टॅन्ड पर्यंत. ट्रॉली 44 | 40000/- |
| 24. | रखडलेली नानाजी देशमुख नविन समिती स्थापन करणे<br>व ग्रामसभेमधुन आलेल्या अर्जाना नियमाप्रमाणे मंजुरात देणे. | -<br>- |
| 25. | ग्रा.प. कार्यालयात दिवाळी साजरी करणे. | - |
| 26. | गावात बंद असलेले लाईट बदलुन नविन लाईट बसविणे.<br>कोरोना लसीकरण आढावा सभा पाई मंदीर जलंब येथे 2 वेळा<br>मा. तहसिलदार, टि.एच.ओ. वैदयकिय अधिकारी आशा वर्कर,<br>अंगणवाडी सेविका, ग्रा.प. कर्मचारी यांची आढावा बैठक. | |
| 27. | घन कचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत गावातील<br>गावाबाहेर जाणारे करिता आराखडा मंजुर | 46लाख |
| 28. | ग्रा.प.अंतर्गत सामान्य निधीतून दिव्यांग 5% निधीतुन<br>10 दिव्यांग बांधवांना संसार रूपी भांड्यांचा सेट वाटप करणे. | 36000/- |
| 29. | क्षारामुळे खराब झालेली पाईप लाईन काढणे व आवश्यक<br>ठिकाणी नविन पाईप लाईन 1) गजानन उगले याचे घराजवळ<br>2) संजय जोशी यांचे घराजवळ. 3) रामदास माठे यांचे घराजवळ.<br>4) अनंता नरवाडे यांचे घरासमोरील | 70000/- |
| 30. | कोरोना लसीकरणासाठी व जनजागृती करण्यासाठी व सहकार्य<br>करणा-या शिक्षक व आरोग्य सेवक नर्स, आशा वर्कर, अंगणवाडी कर्मचारी,<br>ग्रा.प. कर्मचारी यांचा प.स.सदस्य, सरपंच, उपसरपंच यांच्या हस्ते सत्कार करणे | |

# दि. ९ फेब्रुवारी २०२१ ते २७ मे २०२३ या कार्यकाळात जलंब गावात पूर्णत्वास गेलेली विविध विकासकामे

| अ. क्र. | विकासकामांचा तपशील | खर्च अंदाजे |
|---|---|---|
| 31. | ग्रामपंचायत कार्यालयाला ग्राम मंदिराप्रमाणे समजुन रंगरंगोटी, फर्निचर बसविणे, आवारात पेव्हर ब्लॉक बसविणे व वृक्ष लागवड | 400000/- |
| 32. | ग्रा. प. अंतर्गत मकर संक्रात निमीत्त हळदी कुंकु कार्यक्रम | - |
| 33. | गावठाण ते स्मशानभुमी पर्यंत कच्चा रस्ता 35 फुट रुंदीकरण 36 तास जे.सी.बी., 3 दिवस व ट्रॉली भाडे बाकी. | 50000/- |
| 34. | महिला बचत गट कार्यक्रम आयोजित करणे व बचत गटातील महिलांना मार्गदर्शन करणे प्रोत्साहीत करणे. | |
| 35. | पोलीस स्टेशन लगतचा रस्ता रुंदीकरण करणे. | 35000/- |
| 36. | वार्ड नंबर 3 मध्ये बळीराम सुलताने, सारंगधर मोहे ते एकनाथ पाखरे यांचे घरासमोर मुरुम | --- |
| 37. | जलजिवन मिशन अंतर्गत ज्या नागरिकांकडे नळ नाही. त्यांना नळ कनेक्शन देणे. 140 + 57 (जास्तीचे ) नळ कनेक्शन दिले. | 322000/- |
| 38. | ग्रा. प. कार्यालय डिजीटल करण्याकरिता नागरिकांच्या सोयीसाठी नविन लॅपटॉप कलर प्रिंटर खरेदी करणे सामान्य निधीमधुन | 49500/- |
| 39. | गावाच्या मागणीनुसार व भविष्याचा विचार करुन ग्रा.प.च्या मालकीच्या जागेत नविन पाण्याची टाकी बांधकाम व फिल्टर प्लॅन घेणेबाबत ठराव घेणे. (जलजीवन मिशन अंतर्गत) | 2 कोटी(अं.) |
| 40. | गावाच्या विकासासाठी ग्रा.प.चे सर्व सदस्य गण व जलंब गावाच्या सहकार्याने व विश्वासाने 1 वर्ष कालावधी पुर्ण झाल्याबद्दल कमी खर्चात 9 हायमास्ट लाईट मोठे लावण्यात आले. 1)स्टेशन बसस्टॅन्ड, 2) जलंब गाव बस स्टॅन्ड, 3)जुने बस स्टॅन्ड, 4) सेंट्रल बैंक 5) भिम नगर, 6) दुर्गा चौक, 7) गोठण, 8) नायसेचे दुकाण9) सतिष सोनटक्केच्या घराजवळ. | 80000/- |

| अ. क्र. | विकासकामांचा तपशील | खर्च अंदाजे |
|---|---|---|
| 41. | मा. शिवशंकर पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ आदरांजली ग्रा.प.च्या वतीने करण्यात आली. | |
| 42. | छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्य अभिषेकानिमीत्त शासन निर्णयाप्रमाणे भगवा ध्वजारोहण करण्यात आला. | |
| 43. | तरोडा डी रस्ता खडोन भरणे. | 10000/- |
| 44. | स्मशानभुमी मध्ये रुडी व मुरूम टाकणे, | 10000/- |
| 45. | गजानन सुलताने ते स्मशानभुमी रस्ता रुंदीकरण करणे. | 15000/- |
| 46. | गावात, स्टेशन रस्ता, शाळा परिसर, सार्वजनिक ठिकाणी तणनाशक राउंडअप फवारणी करणे. | 25000/- |
| 47. | त्रिशंकु नगर मध्ये रस्ता खडीकरण करणे. 15 वित्त आयोग. | 10000/- |
| 48. | स्मशानभूमीमध्ये शेडला टिनपत्रे (सा.नि.) | 25000/- |
| 49. | स्मशानभूमीमध्ये 6 नग बैंच (15 वित्त आयोग) | 36000/- |
| 50. | स्मशानभुमी रोडवर ग्रा.प. वतीने स्ट्रीट लाईट (सा.नि.) 9 पोल | 95000/- |
| 51. | दुगदिवी मंदिर ते भास्कर मंडवाले पेवर बसविने व इतर (सा.नि.) | 70000/- |
| 52. | गावातील ज्या परिवारावर दुःखद प्रसंग आला त्यांना ग्रा. पं. कडून सांत्वनपर 25 कॅन आर. ओ. चे पाणी मोफत देण्यात आले. | |
| 53. | शिवहरीभाऊ देवचे परीवारास आर्थिक मदत ग्रा.प.च्या वतीने | 51700/- |
| 54. | आमदार निधीमधुन गोठण ते स्मशान भुमीपर्यंत रस्ता डांबरीकरण (आमदार निधी) | 150000/- |
| 55. | ग्रा.पच्या खातेदारांनी सन 2022/23 पर्यंत घरकर/पाणीकर भरणा पुर्ण निल केला त्या खातेदारांना अंदाजे 400 कॅन ग्रा.प.च्या वतीने R.O. निविन कॅन मोफत देण्यात आली. | 260000/- |
| 56. | सन 2022/23 ग्रा.प.च्या दिव्यांग 5% निधीमधुन दिव्यांग बांधवांना लाभ दिला. एकण 47 (सा.नि.) | 47000/- |

# दि. ९ फेब्रुवारी २०२१ ते २७ मे २०२३ या कार्यकाळात जलंब गावात पूर्णत्वास गेलेली विविध विकासकामे

| अ. क्र. | विकासकामांचा तपशील | खर्च अंदाजे |
|---|---|---|
| 57. | हातपंप झोपडपट्टी 1 हातपंप सचिवालय समोर (मा. नि) | 300000/- |
| 58. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर विहीर दुरूस्ती. | 25000/- |
| 59. | मुरलीधर नरवाडे ते दातीर शेरी पेव्हर बसविणे (जि.प.) | 100000/- |
| 60. | देवीचे मंदीर ते बाळु फंदाट पेव्हर बसविणे (प.स.) | 265000/- |
| 61. | स्मशानभुमीमध्ये मुत्रीघर बांधणे (प.स.) | 125000/- |
| 62. | मंगेश डवले ते नंदु चांगल सिमेंट रस्ता ( प.स.) | 25000/- |
| 63. | श्री पाई विद्यालय मधुन 12 वीमध्ये पहिली आलेली कु.लक्ष्मी सारंगधर मोहे हिच्या हस्ते 15 ऑगस्ट 2022 ला ध्वजारोहण व कु.निकीता सुनिल चोपडे हिच्या हस्ते २६ जाने.२३ रोजी यांच्या हस्ते ध्वज वंदन | |
| 64. | जि.प.शाळा मुलांची येथे पाण्याची टाकी बांधकाम (प.स.) | 100000/- |
| 65. | छत्रपती शिवाजी महाराज मंगल कार्यालय कलरिंग करणे (सा.नि.) | 68000/- |
| 66. | महात्मा ज्योतीबा फुले व्यापारी गाळे व क्रांतीसुर्य महाराणा प्रताप व्यापारी गाळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यापारी गाळे, अहिल्यादेवी होळकर सभागृह कलरिंग (सा.नि.) | 82000/- |
| 67. | ग्रामपंचायत R.O.फिल्टर प्लॉन्ट रोज 100% फिल्टर पाणी | |
| 68. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पेव्हर बसविणे. | 200000/- |
| 69. | दुध डेअरी ते रामेशअवर कंठाळे पेव्हर ब्लॉक बसविणे | 20000/- |
| 70. | अंगणवाडी सचिवालयाजवळ पेव्हर बसविणे. | 125000/- |
| 71. | जि. प. कन्या शाळा रस्ता करणे पेव्हर. | 100000/- |
| 72. | आठवडी बाजारात 1 मुत्रीघर बांधकाम 1 लेडिज, 2 जेन्ट्स- | 300000/- |
| 73. | अर्जुन डांगे घरासमोर मुत्री घर बांधकाम. | - |
| 74. | राजेश अवचार ते सुनिल डाबेराव सिमेंट रस्ता | 300000/- |
| 75. | सोसायटी गोडावुन ते शिवहरी देवचे यांचे घरापर्यंत नाली बांधकाम | - |

| अ. क्र. | विकासकामांचा तपशील (प्रस्तावित) | खर्च अंदाजे |
|---|---|---|
| | वामनदादा कर्डक नगर | |
| 1. | अशोक सावळे ते खंडेराव नाली बांधकाम 250 फुट - | 300000/- |
| 2. | रमेश गव्हांदे ते रामभाऊ सोनोने कॉंक्रीट रस्ता 170 फुट | 300000/- |
| 3. | दादन रगडे ते संजय हेलोडे नाली बांधकाम. - 300 फुट | 300000/- |
| 4. | अरुन सावळे ते श्यामा म्हस्के कॉक्रीट रस्ता. 130 फुट | 300000/- |
| 4. | रमेश मानकर ते रवि खोंदील कॉंक्रीट रस्ता | 400000/- |
| 5. | रमेश मानकर ते रवि खोंदील अंडर ग्राऊंड नाली | 150000/- |
| 6. | अनिल ठोंबरे ते देवानंद गव्हांदे अंडर ग्राऊंड नाली | 100000/- |
| 7. | देविचे मंदीर ते बाळु फंदाट पेव्हर ब्लॉक पं.स. शेगाव. | 265000/- |
| 8. | देविचे मंदीर ते बाळु फंदाट अंडर ग्राऊंड नाली - 15 वित्त आयोग | 150000/- |
| 9. | दातीर ते मुरलिधर नरवाडे पेव्हर ब्लॉक. जि.प.बुलढाणा | 132000/- |
| 10. | खंडेराव ते राजेंद्र डौलकार अंडर ग्राऊंड नाली. 15 वित्त आयोग. | 200000/- |
| | **प्रस्तावित कामे मंजुर झालेले प्र.मा. निघालेली** | |
| | श्री पाई मंदीराला सिमेंट कंपाऊंड वॉल | 1800000/- |
| 1. | कमान ते गोठनपर्यंत डांबरीकरण | 2000000/- |
| 2. | गोडावून ते शिवहरी देवचे सिमेंट रस्ता | 800000/- |
| 3. | स्मशानभुमी येथे सभामंडप | 1500000/- |
| 4. | घनकचरा व्यवस्थापन स्वच्छ भारत मिशन | 4600000/- |
| | प्लास्टिक युनिट पं. स. मधून | 1600000/- |
| | जि. प. कन्या शाळा कंपाउंड वॉल | 300000/- |
| | डी. पी. ते रामेश्वर मोहे सिमेंट रस्ता (प्र. मा. बाकी) | 1000000/- |
| | विजू सैतवाल ते भिकाजी काचुटे सिमेंट रस्ता (प्र. मा. बाकी) | 1000000/- |

# मानवता हाच माझा धर्म ! जनतेची सेवा हीच माझी पूजा !

समस्त जलंब वासियांना सप्रेम नमस्कार !

मी उत्तम घोपे, सौ मंगला घोपे सरपंच यांचा पती. माझ्या पत्नीमुळे मला आपल्या गावाची सेवा करण्याची जी संधी मिळाली त्याबद्दल मी सर्वांचे पहिले आभार मानतो. सर्वप्रथम माननीय लोकप्रिय विकास महर्षी राणा दिलीप कुमार सानंदा साहेब यांच्या आशीर्वादानेच ही सेवा करण्याची संधी मिळाली व आमचे पॅनलचे मुख्य सूत्रधार व सर्वेसर्वा माननीय नानाभाऊ गव्हांदे यांच्या नेतृत्वाखाली कार्य करताना सहकार्य व मार्गदर्शन लाभले . सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी गावातील प्रतिष्ठित नागरिक, सर्व पुढारी, संघटना पक्ष आणि सर्व मित्रमंडळी विशेषता स्मशानभूमी सुधार समिती यांचे मला खूप सहकार्य मिळाले. काम करत असताना जनतेने माझ्या पत्नीवर व माझ्यावर जो विश्वास प्रेम दाखवले त्याबद्दल आम्ही जीवनभर सर्वांचे उपकाराची परतफेड करू शकणार नाही. असे प्रेम व विश्वास कोण्याही सरपंचावर आपण या अगोदर केलेले नाही. याच प्रेमळ विश्वासाने मला आपली सेवा करत असताना शक्ती व उत्साह आणि ऊर्जा तुमच्यामुळेच मिळत राहिली. वेळोवेळी निर्णय घेत असताना अधिकारी वर्ग, गावातील प्रतिष्ठित नागरिक वेळोवेळी मार्गदर्शन घेऊनच मी विकासाच्या कामाचा निर्णयापर्यंत पोचलो.

गावातील सर्व घटक, सर्व समाज , लहान पासून म्हाताऱ्यापर्यंत यांच्यासोबत सतत संपर्कात असल्याने मला या गावातील समस्यांची माहिती व जाण झाली. अगोदर चार ते पाच महिने मला खूप त्रास झाला. मी सगळ्यांचे ऐकून घेतलं. गावातील सर्व लोक चांगले आहेत आणि गाव हे विकासासाठी चांगला निर्णय घेत असताना आम्ही सर्व एक आहोत हे या अडीच वर्षाच्या कालावधीत दाखवून देण्याचे काम गावातील सर्व विरोधी पक्ष संघटनेने केले. असे एकीकरण असेल तर या गावाचा कायापालट होण्यासाठी कोणीच रोखू शकणार नाही. त्यासाठी जे जे करायचे आहे ते सर्वांना मिळून करण्याचा प्रयत्न केला आहे . मला या गावांमध्ये 99 टक्के लोक चांगले विचाराचे व सत्याला साथ देणारे दिसून आले. जेव्हा जेव्हा आवश्यक पडली तेव्हा समजून घेतल्या गेले. म्हणून यापुढे जलंब गावात कोण्याही पक्षाचे पुढारी व अधिकारी जनतेसोबत वागतील तसाच व्यवहार गावकरी त्यांच्यासोबत करतील. जसे आपण शेतात जे पेरतो तेच उगवते त्याचप्रमाणे आपण जसे वागू तसेच आपल्याला मिळेल . हे सर्व आपल्या स्वभावावर व कामावर अवलंबून आहे.

आमचे काका नानाभाऊ गव्हांदे यांच्याबद्दल अगोदर निवडणुकीत काही विघ्नसंतोषी लोकांनी खूप चुकीचा प्रचार केला गेला पण माझ्या या अडीच वर्षाच्या कार्यकाळात मी जो अनुभव घेतला त्यामध्ये काम करत असताना आतापर्यंत ग्रामपंचायत च्या कारभारात हस्तक्षेप होईल अशा दृष्टीने मला त्यांनी कधीही फोन केला नाही हे नमूद करू इच्छितो. हा अनुभव तुम्ही स्वतः सर्व जनतेने घेतला आहे. कोणत्याही व्यक्तीवर चुकीचा आरोप करत असताना आपण आपल्या चुका सोडल्या पाहिजेत. चुका ह्या माणूसच करू शकतो तो देव नाही की संतही नाही म्हणून चूक झाल्यावर मान्य करणे हा त्या व्यक्तीचा मोठेपणा असतो .

मला सर्व जनतेला सांगायचे आहे की ग्रामपंचायत ही एक गावाचे मंदिर आहे आणि त्या मंदिरात पुजारी कसा असावा हे जनतेच्या हाती आहे आणि पुजाऱ्याने हे सुद्धा लक्षात ठेवलं पाहिजे की हे माझे मंदिर आहे हे आपण कसे ठेवले पाहिजे. त्याची कशी देखभाल केली पाहिजे. जन्मापासून तर मृत्यूपर्यंत सर्व योजना ग्रामपंचायत मधून सर्व कागदपत्र सर्व माहिती मिळते आणि तेच ग्रामपंचायत आपण त्याला मंदिर समजत नाही तर आपण या गावाचा विकासच करू शकत नाही. लाखो रुपयांच्या निधीची उलाढाल त्याच ग्रामपंचायत मध्ये होते. ज्याप्रमाणे आपण आपलं घर नीटनेटके ठेवत काटकसरीने व्यवहार करतो त्याचप्रमाणे सरपंच या नात्याने आपण ग्रामपंचायत सुद्धा चालवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मी जेव्हा घरपट्टी नळपट्टी साठी प्रत्येकाच्या घरी तीन वेळा गेलो (त्याच्यापेक्षा जास्तच गेलो) पण मला जे प्रेम विश्वास आणि मार्गदर्शन आणि समस्या समजल्या त्या अनुभवानंतर आणि काम करत असताना जो मला आनंद मिळाला प्रेम मिळाले, माझ्यावर लोकांनी विश्वास केला त्यांचे मोल मी माझ्या पुर्ण आयुष्यात दिले तरी चुकवू शकत नाही. जलंब गावातील पाणीपुरवठा जल जीवन मिशन अंतर्गत 95 टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामध्ये सर्व गावाला एक दिवस आड पाणी मिळण्याचा देण्याचा माझा संकल्प आहे. त्याचप्रमाणे मी नियोजन केले आहे. त्यामध्ये सर्व सदस्य सरपंच अधिकारी व गावकऱ्यांचं सहकार्य करावे अशी मी आशा करतो.

ग्रामपंचायतचा कारभार करत असताना असे अनेक लोक आहेत त्यांचे सहकार्य मिळाले त्यामध्ये सतीशभाऊ सोनटक्के, धामणकर गुरुजी, सोनटक्के गुरुजी, विठ्ठलभाऊ सोनटक्के, संजयभाऊ गव्हांदे, अमोल काळे, बाळूभाऊ देशमुख, गोपाल मोहे, गणेश देवचे, पांडुरंग घोपे, बबलू देशमुख, हायमास्ट लाईट लावण्यात ज्यांचा सिंहाचा वाटा आहे असे संजय राजपूत, सुनील डाबेराव, राजु अवचार, प्रीतम सोळंके व गावाच्या जनतेसाठी शुद्ध पाणी देण्याचं ज्यांनी सहकार्य केले असे गणेश लागे, राजेश गव्हांदे, सुरेश देवचे यांच्यामुळेच आम्ही या योजना जनतेच्या सेवेत आणू शकलो. गावात स्वच्छता व निरोगी राहण्यासाठी घंटागाडी गावामध्ये चालू करण्यात आले त्यामध्ये दोन मजूर ठेवण्यात आले. स्मशानभूमीसाठी ग्रामपंचायत कडून जे जे सहकार्य झाले ते केले. त्यामध्ये रोड असो लोखंडी बेंच असो वा इतर कोणतेही काम असेल. आज मला गौरवाने सांगण्यात आनंद होतो की गावाची मुक्तिधाम स्मशानभूमी समितीमुळे गावाचे सहकार्यामुळे प्रगतीवर आहे यापुढेही स्मशानभूमी साठी आम्ही समितीमार्फत यापेक्षा कशी चांगली होईल याची काळजी घेऊ.



माझे बालमित्र श्री. उमाकांतभाऊ कांडेकर यांनी फार कमी वेळात ग्रामविकास पुस्तिका सुंदर डिजाईन व प्रिंट करून दिली. यात आकडेवारी किंवा इतर चुका राहिल्या असतील तसेच सहकार्य करणाऱ्यांची नावे, फोटो अनवधानाने सुटले असतील त्यांची मी दिलगिरी व्यक्त करतो. धन्यवाद ! पुनश्च सगळ्यांचे मनःपूर्वक आभार !


श्रीराम मोहे ते अभयसिंग राजपूत सिमेंट रस्ता


प्रकाश काळे ते संतोष जांभे सिमेंट रस्ता


वामनदादा कर्डक नगर सिमेंट रस्ता


सावता माळी चौक सिमेंट रस्ता


संताजी चौक ते चांगल यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता


अण्णाभाऊ साठे नगर सिमेंट रस्ता


स्टेशन दर्गा जवळील सिमेंट रस्ता


रमेश मानकर ते जितू राजपूत सिमेंट रस्ता


अशोक राठी शेताजवळील सिमेंट रस्ता



गणेशभाऊ काकड ते विठ्ठलभाऊ उगले घरापर्यंत



देवीचे मंदिर ते बाळूभाऊ फंदाट पेव्हर ब्लॉक



पंचशील नगरमध्ये पेव्हर ब्लॉक



भिमनगर मधील समाज मंदिरासमोर पेव्हर ब्लॉक



ग्राम पंचायत कार्यालयासमोर पेव्हर ब्लॉक



मुरलीधर नरवाडे ते जामोदे घरापर्यंत पेव्हर ब्लॉक



भास्कर मंडवाले यांचे घराजवळ पेव्हर ब्लॉक बसविणे



अंगणवाडी केंद्र 1 ते 5 जवळ पेव्हर ब्लॉक



दूध डेअरी ते विठ्ठल अकोटकार पेव्हर ब्लॉक बसविणे


गोठण ते स्मशानभूमी पर्यंत रस्ता रुंदीकरण


विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी पो.स्टे. च्या बाजूचा रस्ता रुंदीकरण


स्मशानभूमी नुतनीकरण


गजानन सुलताने ते स्मशानभूमी रस्ता रुंदीकरण


त्रिशंकु नगरमध्ये रस्ता खडीकरण


वॉर्ड नं ३ मध्ये रस्ता खडीकरण


स्मशानभूमी रस्ता डांबरीकरण


भिम नगर सिमेंट रस्ता पाण्याच्या टाकी समोरील


प्रकाश सावळे ते वीरू राजपूत सिमेंट रस्ता



जनसेवेसाठी सर्व सुविधायुक्त ग्राम पंचायत कार्यालय



नवीन व्यायामशाळा बांधकाम



व्यायामासाठी जिम चे नवे साहित्य




मुक्तिधाम सुशोभिकरण व नूतनीकरण




मागासवर्गीय वस्तीसाठी नवीन स्वच्छतागृह




राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृहाचे बांधकाम



छत्रपती शिवाजी महाराज मंगल कार्यालयाचे कलरींग



क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले शॉपिंग कॉम्प्लेक्सचे कलरींग



महाराणा प्रतापसिंह कॉम्प्लेक्सचे कलरींग


सांडपाणी गावाबाहेर काढण्यासाठी भूमिगत पाईपलाईन


घराघरातील कचरा गोळा करण्यासाठी नवीन घंटा गाडी


पंचशिल नगरमध्ये सिमेंट नाली बांधकाम


बजरंग नगरमध्ये सिमेंट नाली बांधकाम


वामनदादा कर्डक नगरमध्ये  सिमेंट नाली बांधकाम


जुने बस स्टॅन्ड ते  नवीन बस स्टॅन्ड पर्यंत नाल्यांची स्वच्छता


चौकाचौकात नवीन कचराकुंड्या



चौकाचौकात नवीन कचराकुंड्या


गाजरगवत नष्ट करण्यासाठी तणनाशक फवारणी



मधुकर गाढे यांचे घराजवळ जेसीबी ने नाली खोदकाम



गावात सर्व ठिकाणी नालीवर नवीन धापे टाकणे



ग्रा.पं.मालकीची वटपोर्णिमा त्रिगुणी जागेला दुरुस्ती करणे व गेट बसणे



सार्वजनिक विहिरींची दुरुस्ती व नवीन कठडे बांधकाम



क्षारामुळे खराब झालेली पाईप लाईन बदलून नवीन टाकणे



ग्रामपंचायत स्वागत कमान गेटची  कलरिंग



गावातील बायोगॅस लाभार्थी गावकरी




फरशी नाल्यावरील शेत रस्ता दुरुस्ती



नानाजी देशमुख योजनेमधून कांदा चाळ


मधुकर गाढे यांचे घराजवळ जेसीबी ने नाली खोदकाम


गावात सर्व ठिकाणी नालीवर नवीन धापे टाकणे


ग्रा.पं.मालकीची वटपोर्णिमा त्रिगुणी जागेला दुरुस्ती करणे व गेट बसणे


सार्वजनिक विहिरींची दुरुस्ती व नवीन कठडे बांधकाम


क्षारामुळे खराब झालेली पाईप लाईन बदलून नवीन टाकणे


ग्रामपंचायत स्वागत कमान गेटची  कलरिंग


गावातील बायोगॅस लाभार्थी गावकरी



फरशी नाल्यावरील शेत रस्ता दुरुस्ती


नानाजी देशमुख योजनेमधून कांदा चाळ



नवीन पाणी पुरवठा योजनेचे प्रगतीपथावर असलेले काम



जि. प. मुलांची शाळा येथे उभारलेली पाण्याची टाकी



जलजीवन मिशन अंतर्गत गावकऱ्यांना 210 नवीन नळ कनेक्शन



आर. ओ. फिल्टर द्वारे गावकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध




कराचा भरणा करणाऱ्या ग्रामस्थांना नवीन आर. ओ. कॅन भेट



ग्रा. पं. च्या वतीने घरोघरी जीवन ड्रॉप चे मोफत वाटप



रेल्वे स्टेशन परिसरात सिमेंट नाली बांधकाम



मागासवर्गीय वस्तीत सिमेंट नाली बांधकाम



स्मशानभूमीत नवीन मुतारी बांधकाम



पंचशील नगर स्टेशन पेव्हर ब्लॉक



संतोष काळे ते ज्ञानेश्वर देवचे अंडरग्राऊंड नाली अनंत नरवडे घरासमोर



वसंता घोपे ते महादेव सोनटक्के, धामणकार गुरुजी घरासमोरची 4 ठिकाणी नाली दुरुस्ती




प्रा. आ. केंद्राच्या परिसरात सौंदर्यीकरण



भिमनगर मध्ये अंडरग्राऊंड नाली



मानकर ते बस स्टॅन्ड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर ते पानतीचे दुकान ६ इंची नवीन पाईप



नागरिकांच्या सुरक्षतेसाठी २ ठिकाणी CCTV कॅमेरा



जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप




अंगणवाडी व जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप



विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे वितरण



म. प्रा. शाळेत ई लर्निंग संच भेट



कोरोना काळात ६४ लसीकरण कॅम्पचे आयोजन



नानाजी देशमुख योजनेअंतर्गत महिला बचत गटासाठी ट्रॅक्टर खरेदी



-----------------------------------



ग्रामपंचायत च्या वतीने रक्तदान शिबीर



ग्रा. पं. कर्मचारी स्व.शिवहरी देवचे यांच्या कुटुंबीयास आर्थिक मदत



दिव्यांग बांधवाना संसारोपयोगी साहित्याचे वाटप



अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांच्या वतीने स्वच्छता अभियान




"सकाळ आयडॉल्स ऑफ महाराष्ट्र" या पुरस्काराने उत्कृष्ट सरपंच म्हणून सन्मान



"सकाळ आयडॉल्स ऑफ महाराष्ट्र" पुरस्कार सोहळा




"सकाळ आयडॉल्स ऑफ महाराष्ट्र" पुरस्कार सोहळा



ग्रामपंचायत मध्ये दिवाळीनिमित्त लक्ष्मीपूजन करणे



म. ग्रा. रो. ह. यो. अंतर्गत कुरखेड रस्त्यावर वृक्ष लागवड



बाजार चौकात वृक्षारोपण



ग्रामपंचायत कार्यालय प्रांगणात वृक्षारोपण



जि. प. मराठी शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण



ग्रामपंचायत च्या वतीने वृक्षारोपणासाठी गावकऱ्यांना रोपे वितरण



५४ लक्ष रु. खर्चाच्या पाण्याची टाकी बांधकामाचे भूमिपूजन



पंचशिल नगरातील सिमेंट रस्ता कामाचे भूमिपूजन



गावातून जाणान्या उड्डाण पुलाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याचा ठराव



सरपंचांच्या वाढदिवसानिमित्त जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना साहित्य वाटप



जि. प. समाज कल्याण अधिकारी मेरत साहेब यांची भेट



कचरा संकलनासाठी नवीन घंटागाडी शुभारंभ




गाड्यांना पूर्ववत थांबा मिळावा यासाठी रेलरोको आंदोलन




रेल रोको आंदोलनाबाबत मिडिया समोर ग्रामवासियांच्या भावना मांडताना



पेट्रोल डिझेल भाववाढी विरोधात आंदोलनात सहभाग


छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पुतळ्यास अभिवादन


भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस व संविधान प्रतीस अभिवादन


ग्रा. प. मध्ये महात्मा ज्योतिबा फुले जयंती


ग्रा. पं. तर्फे तिळसंक्रांत निमित्त हळदी कुंकुवाचा कार्यक्रम


ग्रा. पं. मध्ये माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी


विद्यार्थिनीच्या हस्ते १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहन


दिवंगत स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून आदरांजली


स्व. शिवशंकरभाऊ पाटील यांना श्रद्धांजली


शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त ग्रा . प. मध्ये ध्वजारोहन



कोरोना लसीकरण शिबीर आढावा बैठकीचे २ वेळा आयोजन



सरपंच सौ. मंगलाताई घोपे यांच्या वाढदिवसानिमित्त बचतगटांना भेटवस्तू



ग्रा. प. कार्यालयात स्वातंत्र्य दिन उत्सव



ग्रामपंचायत च्या वतीने रक्तदान शिबीर



"आझादी का अमृत महोत्सव " सोहळ्यानिमित्त तिरंगा रॅली



भारत जोडो यात्रेसाठी गावातून तिरंगा रॅली



सीईओ साहेबांची भेट व महिला बचत गटांना मार्गदर्शन



पं. स. गट विकास अधिकाऱ्यांचे कमर्चाऱ्यांना मार्गदर्शन



ग्राम स्वराज प्रशिक्षण शिबिरात सत्कार



ग्रा. प. कार्यालयात दिवाळी उत्सव



दिवाळी निमित्त ग्रा. प. कार्यालयायावर रोषणाई



प्रत्येक सण उत्सवाला ग्रा. पं. कार्यालयाची सजावट



-----------



महिला बचत गटांसाठी मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन



अंगणवाडी कार्यक्रम



ग्रा. पं. तर्फे दिव्यांग बांधवांचा सत्कार



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, माजी आमदार दिलीपकुमार सानंदा, माजी आमदार राहुल बोन्द्रे स्वागत



माजी केंद्रीय मंत्री मुकुलजी वासनिक यांची जलंब भेट प्रसंगी सत्कार

## कार्यासाठी प्रेरणा देणारी स्मशानभूमी सुधार समिती जलंब




महादेव सोनटक्के
अध्यक्ष


रामभाऊ थामणकर
सचिव


उत्तम घोपे
सदस्य


सतीश सोनटक्के
सदस्य


अरुण काळे
सदस्य


संजयसिंग राजपूत
सदस्य


मंगेश डवले
सदस्य


सुरेश शिवरामे
सदस्य


निवृत्ती मोहे
सदस्य


संतोष थामणकर
सदस्य


अमोल जऊळकार
सदस्य


अतुलसिंग राजपूत
सदस्य


प्रदीप काळे
सदस्य


संदिप सोनटक्के
सदस्य


दिपक माठे
सदस्य


निंबाजी कोठाळे
सदस्य


संतोष वानेरे
सदस्य












# सरपंच सौ. मंगलाताई उत्तम घोपे यांच्या पुढाकारातुन ग्रामपंचायतचे कोणतेही बिल न काढता केलेले सेवा कार्य

| अ. क्र. | विकासकामांचा तपशील | इस्टिमेटनुसार खर्च अंदाजे |
|---|---|---|
| 1. | नाल्यातील 2 हातपंपच्या बाजुला सिमेंट ओटा बांधकाम करणे. | 15000/- |
| 2. | विठ्ठल रुखमाई मंदीर ओटा बांधकाम करणे. | 10000/- |
| 3. | महाराणा प्रताप चौक आठवडी बाजार 6 ब्रास गट्टु बसविणे | 90000/- |
| | व वृक्ष लागवड करणे. | 2000/- |
| 4. | महाराणा प्रताप चौक आठवडी बाजार मध्ये हायमास्क लाईट लावणे | 50000/- |
| 5. | मराठी शाळेमध्ये महाराणा प्रताप पुतळ्याजवळ 1.5 ब्रास गट्टु बसविणे | 8000/- |
| 6. | झोपडपट्टी देविचे मंदीरमध्ये प्लॉस्टर व स्टाईल बसविणे. | 40000/- |
| 7. | भवानी देवीच्या मंदीराजवळ 5.50 ब्रास बसविणे. | 80000/- |
| 8. | छत्रपती शिवाजी महाराज चौक मध्ये 5 ब्रास गट्टु बसविणे. | 29000/- |
| 9. | स्मशान भुमी मध्ये 4 हायमास लाईट लावणे. | 5000/- |
| 10. | बस स्टॅन्डपासुन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा रेल्वे स्टेशनपर्यंत | 120000/- |
| 11. | पाणी पुरवठा पाईप लाईन6 इंची 6 KG नविन टाकणे. | |
| 12. | छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ वॉल कम्पाउंड | 15000/- |
| 13. | राधेश्याम जामोदे ते रमेश दातीर यांच्या घरापर्यंत गट्टु बसविणे 7 ब्रा.स | 115000/- |
| 14. | जुने बसस्टॅन्ड ते 2 मो-या पर्यंत विद्युत पोल 4 व त्यावर लाईट लावणे - | 30000/- |
| 15. | सार्वजनिक मुंजेबाबा ओटा बांधकाम गट्टु बसविणे | 30000/- |
| 16. | मरीमाता मंदिर पेवर गट्टु बसविणे | 24000/- |
| 17. | राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृहाजवळ गट्टु बसविणे | 25000/- |
| 18. | पोलीस स्टेशन मध्ये मंदीराला 2 ब्रास गट्टु बसविणे | 16000/- |
| 19. | भैय्या देशमुख घराजवळ टप्पा 2)मुंजेबाबा चौक 3) भवानी मंदीर | 40000/- |
| 20. | शिवा श्रीनाथ ते विठ्ठल आकोटकार | - |
| 21. | संतोष चोंडकर ते केशव देशमुख | - |
| 22 | जगन चोपडे ते बाळु काळे अंडर ग्राउंड नाली ते पाईप लाईन 6 इंची 300 फुट | 220000 |

| अ. क्र. | विकासकामांचा तपशील | इस्टिमेटनुसार खर्च अंदाजे |
|---|---|---|
| 21. | पीक विमा मोर्चा एस डि ओ. उपविभागीय अधीकारी खामगाव | 22500/- |
| 22. | खासदार प्रतापराव जाधव भेट मेहकर 1 गाडी. | |
| 23. | रेल्वे रोको आंदोलन जलंब स्टेशन | |
| 24. | रेल्वे मंत्री दानवे साहेब भेट 2 गाडी | |
| 25. | तुपकर साहेब विमा मोर्चा बुलढाणा. | |
| 26. | जलंब गावातील उड्डाण पुलाला सर्वानुमते छत्रपती शिवाजी महाराज नाव देण्यात आले. | |
| 27 | अग्रवाल ते देशमुख घरापर्यंत पेव्हर ब्लॉक (प्रस्तावित) | 500000 |

**22 लाख 77हजार 500 /-रु.**

**इस्टिमेटनुसार खर्चाची कामे ग्रामसेवा म्हणून**
**ग्रा. पं. कडून कोणतेही बिल न काढता करण्यात आली.**





महादेव मंदिरात पेव्हर ब्लॉक (80 हजार रु. )



भवानी माता मंदिराजवळ पेव्हर ब्लॉक (80 हजार)



झोपडपट्टी देवीचे मंदिरामध्ये प्लास्टर व टाईल्स (40 हजार रु.)



मरीमाता मंदिर पेवर ब्लॉक व दुरुस्ती (24हजार रू)



महाराणा प्रताप चौक आठवडी बाजार ६ ब्रास पेव्हर ब्लॉक ( 90हजार रू.)



मराठी शाळेमध्ये महाराणा प्रताप पेव्हर ब्लॉक ( 8 हजार रू.)



डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर पेवर ब्लॉक



राधेश्याम जामोदे ते रमेश दातीर घरापर्यंत पेव्हर ब्लॉक (1लाख 15 हजार रु.)



छत्रपती शिवाजी महाराज चौक मध्ये पेव्हर ब्लॉक ( 80हजार रू.)




राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह समोर पेवर ब्लॉक (25हजार रु.)



छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला लोखंडी कंपाऊंड (15हजार रु.)



पो.स्टे.परिसरात आसरा माता मंदिराला पेव्हर ब्लॉक (16हजार रु.)



सार्वजनिक मुंजे बाबा ओठा बांधकाम पेवर ब्लॉक (30 हजार रु.)



विठ्ठल रुख्माई मंदिर ओटा बांधकाम (10 हजार रु.)



भैय्या देशमुख घराजवळील टप्पा व भवानी मंदिरासमोर (40 हजार रु.)



नाल्यातील दोन हातपंपाच्या बाजूला सिमेंट ओटा बांधकाम



जि. प. मराठी शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण



विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांसाठी बस स्टॅण्डवर सिमेंट बाकडे


झोपडपट्टी ते रेल्वे स्टेशनपर्यंत नवीन ६ इंची पाईप लाईन टाकणे (इस्टिमेटनुसार 12लाख रु.)


श्रीनाथ ते आकोटकर, चोंडकर ते देशमुख व चोपडे ते काळे अंडरग्राऊंड नाली ( 2लाख 20हजार रु.)


महाराणा प्रताप चौकात हायमास्ट लाईट (50हजार रु.)


जुने बस स्टॅन्ड ते दोन मोऱ्यापर्यंत ४ विद्युत पोल व ईट (30हजार रु. )


रेल्वे रोको आंदोलन , रेल्वेमंत्री दानवे साहेब भेट, शेतकरी मोर्चा बुलढाणा (20हजार रु.)


पिक विमा मोर्चा उपविभागीय अधिकारी खामगाव कार्यालयावर (3हजार रु.)


मुक्तिधाम मध्ये ४ हायमास्ट लाईट


मुक्तिधाम मधील सौंदर्यीकरण


मुक्तिधाम मध्ये वृक्षारोपण ( संवर्धन करताना कु. पल्लवी सतिष सोनटक्के)

# सरपंच सौ. मंगलाताई उत्तम घोपे यांच्या कार्यकाळातील विकास कामांबद्दल प्रतिष्ठितांचे मनोगत

## मंगलाताईच्या कार्यकाळात जलंबचा नावलौकिक वाढला

मी अनिल महादेवराव गव्हांदे . जलंब गावचा माजी प्रथम नागरिक व पॅनल प्रमुख म्हणून माझे मनोगत मी व्यक्त करीत आहे. "गावाचा विकास हाच माझा ध्यास" या ध्येयातून मी माझे कालावधीत केलेल्या कामांचे मूल्यमापन व जलंब गावाचा चा अधिकाधिक विकास कसा होईल या दृष्टिकोनातून पॅनल उभे केले. त्यामध्ये मेहनत करणारे व जास्तीत जास्त वेळ गावाचे विकासाकरता देऊ शकतील अशा व्यक्तींची सदस्यांकरता निवड केली व घवघवीत यश संपादित केले.

नवख्या सदस्यांना योग्य ते मार्गदर्शन वेळोवेळी करून व "केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे" या युक्तिचे महत्त्व पटवून गावाची धुरा त्यांच्यावर सोपवली. सरपंच पद सौ. मंगलाताई उत्तम घोपे यांना देऊन गावाला लौकिक मिळाला. उत्कृष्ट गाव म्हणून मिळालेल्या नाव लौकिकाने सार्थक झाल्याचे वाटले. सरपंच व सर्व सदस्यांनी प्रत्येक महापुरुषांची जयंती व इतर सार्वजनिक कार्यक्रमात ही हिरीरीने भाग घेऊन गावाचे नाव पंचक्रोशीत उज्वल केले.

गावाचा कारभार सांभाळत असताना सरपंच सौ मंगलाताई यांना त्यांचे पती श्री. उत्तम ज्ञानदेव घोपे यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले. म्हणतात ना प्रत्येक यशस्वी पुरुषामागे त्याचे पत्नीचा हात असतो या ठिकाणी उलट म्हणजे पत्नीच्या यशामागे पुरुषाचा हात आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष समानतेचा प्रत्यय येतो.

निस्वार्थी आणि निरागस वृत्तीने समाजाला आयुष्य समर्पित करण्याचा ध्येयवाद या दोघा पती पत्नीमध्ये दिसून येतो. गावाची होत असलेली प्रगती प्रशंसनीय आहे. भावी काळात ती उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावी याकरिता मी मंगल कामना व्यक्त करतो.

**"हीच आमची प्रार्थना आणि हेच आमचे मागणे माणसाने माणसाशी माणसासम वागणे"**

भवतु सब्ब मंगलम !



**अनिल महादेवराव गव्हांदे**

पॅनल प्रमुख ग्रामपंचायत जलंब

## जलंबच्या इतिहासात पहिल्यांदा मोठ्या प्रमाणात विकास कामे !

जलंब ग्रामपंचायत च्या सरपंचपदी सौ मंगलाताई उत्तमजी घोपे यांची 9 फेब्रुवारी 2021ला ग्रामविकास पॅनल च्या सदस्य मधून निवड झाली.

त्या दिवसापासून आपण अडीच वर्ष च्या कालावधीमध्ये समाजासेवक उत्तम भाऊ घोपे हे सरपंच मंगलाताई यांना सोबत घेऊन 12 तासाच्या वर गावातील कामासाठी हजर असत. मग ते काम गावातील साफसफाई करून घेणे, नाल्या काढून घेणे, पिण्याच्या पाण्याची समस्या, गावातील तंटे सोडवणे, लाईट ची समस्या अश्या सर्व ठिकाणी स्वतः हजर राहून त्यांनी काम करून घेतले. अनेक कामाच्या माध्यमतुन त्यांनी अवघ्या 6 महिन्यामध्ये गावकऱ्यांचा विश्वास संपादन केला. 15 वा वित्त आयोगमधून योग्य नियोजन करून गावातील प्रमुख कामे हाती घेऊन ते सोडवले. समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून वार्ड क्र 1व 2 व 5 मधील रस्ते, नाल्या हे आज पर्यंत दुर्लक्षित होते ते त्यांनी निधी आणून ते करून दाखवले. त्या नंतर वार्ड क्र 5 मध्ये पाईप लाईन टाकून त्या भागातील नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावला. दोन मोरी भागातील रस्ता सपाट करून तेथे लाईटची सोय उपलब्ध करून् दिली. त्याचबरोबर स्मशानभूमी येथे लाईट सोय उपलब्ध करून रस्त्याची समस्या सोडवली. गावातील प्रमुख चौक या ठिकाणी हायमास्ट लाईट लावणे, पेव्हर ब्लॉक बसविणे ही कामे सुद्धा त्यांनी केली. तसेच ग्रामपंचायत माध्यमातून गावात कचरा कुंडी लावणे, गावात घंटा गाडीद्वारे कचरा संकलन करणे ही आरोग्यसेवेची कामे पूर्ण केली. ग्रामपंचायत मध्ये आर ओ चे पाणी उपलब्ध करून.. पाणी कर व घर कर भरणा केलेल्या नागरिकांना आर. ओ. कॅन मोफत देऊन..एक कर भरणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहन दिले.

या कामाच्या पद्धतीने तुम्ही जलंब गाव चे नाव तालुक्यात अभिमानाने मोठे केले हे पण आवर्जून पणे सांगावे वाटते. कामे करताना त्यांना सर्व ग्रा. पं..सदस्य यांनी मोलाची मदत करून त्यांना सहकार्य केले. अडीच वर्ष हा कार्यकाळ अतिशय उत्साहित वातावरणात गेला हे समजले सुद्धा नाही.

भविष्यात आपल्याला मोठी जबाबदारी मिळो याव अजून जनसेवा आपल्या हातामधून घडो हिच श्री संत गजानन महाराज चरणी प्रार्थना करतो....!!



**विठ्ठल सोनटक्के**

मा. पंचायत समिती सदस्य

## ग्रामविकासाचा ध्यास घेतलेल्या सरपंच सौ. मंगलाताई

सौ. मंगलाताई घोपे आपण सरपंच म्हणून निवडून आल्या त्याबद्दल आपले व सहकारी ग्रा. पं. सदस्यांचे हार्दिक अभिनंदन! ज्यांनी आपल्याला गटनेतेपदी निवडले ते प्रेरणास्थान श्री. अनिलभाऊ गव्हांदे यांचे हार्दिक यांचे आभार . तुमच्या मनात गावाचा विकास करण्याचा ध्यास होता त्याप्रमाणे आपण कार्याला सुरुवात केली.

प्रथम आपण ग्रामपंचायत कार्यालय कसे सुशोभित करता येईल यासाठी प्रयत्न केले. कार्यालयासाठी खुर्च्या उपलब्ध केल्या. ग्राम विकास अधिकारी, सरपंच, उपसरपंच यांना बसण्याची स्वतंत्र व्यवस्था केली. कामकाज व्यवस्थित होण्यासाठी लिपिकाची व्यवस्था केली. केवळ १० रु. मध्ये १ कॅन शुद्ध आर. ओ. पाणी पाण्याची उपलब्धता केली. मंगल कार्यालय व अहिल्याबाई होळकर भवनाचे सौंदर्यीकरण केले. दलित वस्तीमध्ये रस्ता दुरुस्ती करून करून नवीन रस्ते तयार केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे सौंदर्यीकरण केले तसेच रेल्वे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या सभोवतालचा परिसर सुशोभित केला. इंदिरानगर मध्ये नवीन सिमेंट रस्त्याचे काम केले. निरनिराळ्या जागी पेव्हर ब्लॉक बसून जागेचे नूतनीकरण केले. गावामध्ये स्वच्छता मिशन राबवून कुठेही कचरा दिसू नये म्हणून घंटागाडी आणून तिचा उपयोग केला. दोन स्वच्छता कर्मचारी ठेवले. रामदास मेहसरे हरिभाऊ उगले यांच्या घरासमोर पेवर ब्लॉक बसण्यात आले. आसारा माता मातंग वस्तीमध्ये पेव्हर ब्लॉक बसण्यात आले. गावांमध्ये पुढच्या भविष्यकाळात स्वच्छ पाणी मिळावे म्हणून नवीन पाईपलाईनचे काम केले. गावात कोठेही अंधार दिसू नये म्हणून रस्त्यावर एलईडी लाईट बसविले आहेत. या कामी लाईनमनचे सुद्धा सहकार्य घेतले. राजपूत वेटाळामध्ये मंदिरात पेव्हर ब्लॉक बसविले. भवानी मातेच्या मंदिरात पेव्हर ब्लॉक बसविले. गावामध्ये असलेल्या मंदिरासभोवती पेव्हर ब्लॉक बसविले.

ग्रामपंचायत कर कसा वसूल होईल हे मनात आणून कर भरणाऱ्यास सहाशे रुपयाची कॅन मोफत सप्रेम भेट दिली . स्मशानभूमी सुधारण्यासाठी आपण प्रयत्न केले. या कामी तुमचे पतीदेव श्री उत्तमराव घोपे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांनी स्वतः फुलझाडे आणून व्यवस्थित रांगेमध्ये लावणी केली. मृतदेहाला दहन विधी देण्यासाठी टिनाचे दुसरे शेड तयार करणे करता सहकार्य केले. स्मशानभूमीपर्यंत स्ट्रीट लाईटची व्यवस्था केली. चिखलाचा त्रास होऊ नये म्हणून स्मशान भूमीपर्यंत डांबरीकरण रस्ता तयार केला. ही सर्व कामे करण्याकरिता विरोधी सदस्यांचे आपण सहकार्य घेतले. गावामध्ये शांतता व एकी नांदण्याकरता पोलीस स्टेशनचे वेळोवेळी सहकार्य घेतले. कोरोना काळात जनतेकडे लक्ष पुरवून प्राथमिक आरोग्य केंद्र जलंब यांचे मार्फत कोरोनामुक्त कॅम्प आयोजित केले. ग्रामपंचायत मार्फत जनतेच्या सहकार्याने रोगनिदान शिबिर आयोजित केली. लोकांना हवामान व पाऊस याबद्दल माहिती व्हावी म्हणून हवामान तज्ञ पंजाबराव डख यांचा मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केला या कामी ग्रामपंचायतचे सहकार्य केले. एकंदरीत आपला कार्यकाळ उत्तम पार पडला. या कामी तुम्हाला तुमचे पतीदेव उत्तमराव घोपे यांनी मोलाचे सहकार्य केले. आपणाला अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर, प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी, पोलीस कर्मचारी, बँक कर्मचारी, ग्रामसेवक सहकारी संस्था, प. सं. अधिकारी व कर्मचारी पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले.

आपल्या सोज्वळ शांत निर्भीड स्वभावामुळे आपल्याला सर्व गावाच्या जनतेचे मोलाचे सहकार्य लाभले. अनेक संस्थेने आपल्याला सहकार्य केले. यापुढील पती-पत्नीचे आयुष्य सुखाचे समृद्धीचे भरभराटीचे व निरोगी जावो अशी गजानन महाराज चरणी प्रार्थना करतो. पुन्हा तुमचे पती-पत्नीचे हार्दिक अभिनंदन व आभार मानतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

जय हिंद जय महाराष्ट्र! जय भारत माता!



**महादेव सुकदेव सोनटक्के**

(सेवानिवृत्त शिक्षक)

अध्यक्ष स्मशान भूमी सुधार समिती जलंब

## लोककल्याणकारी वृत्तीच्या सरपंचांची यशस्वी कारकीर्द

सौ मंगलाताई उत्तमराव घोपे जलंब यांची सरपंचपदाची यशस्वी कारकीर्द पाहायला मिळाली. त्यांना हे यश मिळाले ते त्यांचे पती उत्तमराव ज्ञानदेव घोपे यांच्या निस्वार्थी लोककल्याणकारी वृत्तीतून याची जाण सर्व जनतेला आहेच.

गावातील लोककल्याणाचे विकास कामे करताना त्यांनी कोणत्याच प्रकारचा भेदभाव ठेवला नाही . सरपंच पद हे लोकांच्या सेवेसाठी आहे हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले. अडीच वर्षाच्या कालावधीत शासनाच्या निधीतून लोकविकासाची किती कामे होऊ शकतात हे त्यांनी जनतेला प्रत्यक्ष दाखवून दिले. आपल्या सर्व सहकाऱ्यांना व अधिकारी महोदयांना विश्वासात घेऊन त्यांनी कामे पूर्ण केली त्यांनी जलंब गावाकरिता केलेल्या विकास कामांचा आराखडा पाहताना आश्चर्य वाटते. तसेच शासकीय निधीचा वापर न करता स्वखर्च करून गावात काही विकासाची कामे करून जनतेची सेवा केली याचा सुद्धा आनंद होतो. त

्यांनी आपल्या कार्यातून जातीय सलोखा व ऐक्य निर्माण करण्याचे कार्य सुद्धा केले आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहोत हा दृष्टिकोन त्यांनी समोर ठेवला. सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस सर्व शाळांमधील शिक्षिका बचत गटाच्या सर्व महिला आरोग्यसेविका अशा वर्कर, कृषी ताई, बँक सखी सर्व ग्रामपंचायत सदस्या व गावातील प्रतिष्ठित महिला या सर्व नारी शक्तीचे संघटन करून त्यांच्या कर्तव्यात प्रगती व्हावी याकरिता मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन केले .ही कामे करताना त्यांच्या ठिकाणी कोणत्याच प्रकारचा अहंभाव दिसून आला नाही. स्मशानभूमीत सुधारणा करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे त्यांनी ग्रामपंचायतच्या माध्यमातून व स्वखर्चातून स्मशान भूमीला सहकार्य केले. बाहेर गावाहून येणाऱ्या पाहुण्यांचे लक्ष विकास कामांनी खेचून घेतले व जलंब गावामध्ये बऱ्याच सुधारणा झाल्या अशा प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या. हे सरपंचांच्या कामाचे मूल्यमापन होय.

जलंब चे विशेष आकर्षण म्हणजे ठीक ठिकाणी रस्त्यावर बसवलेले पेवर ब्लॉक. मंदिरांच्या आवारांचे सुशोभीकरण, रस्त्यांचे दुरुस्तीकरण , सार्वजनिक ठिकाणी बसण्याकरिता सिमेंट बाकांची व्यवस्था, सरपंचांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, प्राथमिक शाळेच्या मुलांना ड्रेस वाटप व शैक्षणिक साहित्य वाटप अशी बरीच कामे पाहायला मिळाली निश्चितच त्यांनी केलेल्या विकास कामामुळे त्यांना जनतेच्या हृदयात स्थान मिळाले.

एकंदरीत सरपंचांची कारकीर्द मनाला आनंद देऊन पार पडली. भविष्यात ह्या निस्वार्थी जोडीला पुन्हा गावाची ची सेवा करण्याची संधी प्राप्त करून द्यावी अशी जनतेकडून अपेक्षा बाळगतो व त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल हार्दिक शुभेच्छा देतो



**रा. गो. धामणकर**

(सेवानिवृत्त आदर्श शिक्षक)

## मनापासून गावाची सेवा करणाऱ्या सरपंच

कुठून सुरुवात करावी हेच कळत नाही! सौ मंगलाताई उत्तम घोपे सरपंच हा सर्वोच्च सन्मान त्या माऊलीला! ग्रामपंचायत 50% आरक्षण महिलांना, शासन निर्णयापुढे कोण बोलणार! परंतु प्रत्यक्षात कार्यभार कोण सांभाळतो, मी नव्याने सांगायची गरज नाही असं मला वाटते! मग माझे मनोगत त्या दोघांप्रती! "घार हिंडते आकाशी परी तिचे चित्त चित्र पिलांपाशी" या म्हणीप्रमाणे "उत्तम" कुठे जरी असला तरी त्याचे चित्त मात्र गावातच!

उडत्या पाखरांना परतीची तमा नसावी, नजरेत नेहमी नवी दिशा असावी

घरट्याचं काय केव्हाही बांधता येईल, क्षितिजापलीकडे झेप घेण्याची जिद्द असावी

असा "उत्तम" चा जिद्दी स्वभाव. जे काम हातात घेतले ते पूर्णत्वास नेणे. एकाच गावात राहत असून सुद्धा आमची कधी दीर्घ भेट नाही, विचारांची देवाण-घेवान नाही, ग्रामपंचायत मुळे जवळ आलो ते कायम राहण्यासाठी. माणूस कळायला थोडा वेळ लागतो! शेवटी नियतीने बाप लेकांची भेट घालून दिली. बापाने बोलावं आणि काही मुलाने ते निमुटपणे ऐकावं असं आमचं नातं! ग्रामपंचायतचा कारभार सांभाळत असताना सर्वांची मने जिंकणारे हे दोघे. सौ. मंगलाताई आणि उत्तम. यांनी मात्र स्वतःसाठी काही नको, सेवा करायची ना तर मग ती मनापासून करायची! हा ईश्वर योग आहे! आम्हाला गावची सेवा करण्याची संधी मिळाली त्या संधीचा सोनं व्हावं हीच दोघांची अंतरिक इच्छा! ग्रामपंचायतचा झालेला कायापालट सर्वच उघड्या डोळ्यांनी पाहत आहेत म्हणून मी काही वेगळे सांगण्याचे गरज आहे असं मला वाटत नाही.

नेतृत्वाने भार दिला, कर्तृत्वाने हार दिला!

गावाचे नाव उंचावण्या उभयतांनी कारभार केला!

व्यस्त गावाचे कामात, स्वतःचा संसार विसरला

सेवा केली सन्मान केला, सर्वांना भाव दिला!

नानाभाऊ गव्हांदे यांचे नेतृत्व तसेच ग्रामपंचायत च्या सर्व सदस्यांच्या सहकार्याने गावचे सुज्ञ नागरिकांचे आशीर्वाद रुपी सहकार्याने ग्रामपंचायतचा विकास झाला हे सूर्यप्रकाशाएवढे खरे आहे! या सर्व गोष्टी करत असताना बरेच आव्हाने अडथळे राजकारण विरोध याला न जुमानता उत्तम जणू म्हणायचा

रोखण्यात वाट माझी वादळे होती आतुर

डोळ्यात जरी गेली धूळ, थांबण्यास उसंत नाही

येतील वादळे, खेटेल तुफान, तरी वाट चालतो

अडथळ्यांना घेऊन अडखळणे पावलांना पसंत नाही!

माझे मनोगतला शेवट तरी कसा, परंतु कुठेतरी थांबावच लागेल!

वामनदादांच्या दोन ओळी आठवतात

उत्तमा (माणसा) इथे मी तुझे गीत गावे

असे गीत गावे, तुझे हित व्हावे

तुझे दुःख सारे गळूनी पडावे

एकाने हसावे लाखाने रडावे

तुम्हा उभयतांचे आयुष्य असच हसत खेळत जावो उदंड आणि निरोगी आयुष्य लाभो ही तथागत चरणी विनम्र प्रार्थना!



**संजय गव्हांदे**
तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस
ग्रामपंचायत सदस्य जलंब

## "जनसेवेचा आदर्श " व " समाजकल्याणाचा डोंगर " उभा करणाऱ्या "ग्राम पंचायत जलंबच्या सरपंच आदरणीय मंगलाताई घोपे !

अडीच वर्षांपूर्वी ग्रामपंचायत जलंब च्या उंबरठ्यावर एक "मंगल-मयी" पाऊलाची चाहूल लागली.... आणि ...निस्वार्थी, निरपेक्षी आणि पारदर्शी कारभाराचा एक "उत्तम" नमुना जलंबकर अनुभवत आहेत....!!

छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महाराणा प्रताप व शाहू, फुले, आंबेडकर, यांचा "वारसा" घेवून स्वतः अविश्वनिय कर्तृत्वाचा "आरसा" बनून "जनसेवेचा आदर्श व समाजकल्याणाचा डोंगर उभा करणाऱ्या सरपंच आदरणीय मंगलाताई घोपे!

आजच्या लोकशाहीचा कणा पारदर्शकता आहे. त्याच पारदर्शकतेचे जिवंत आणि ज्वलंत उदाहरण, ग्रामपंचायत जलंब यांनी जनता जनार्दन समोर ठेवलें आहे. आज गावाला एका नवीन विश्वासार्ह, आदर्शवादी परंपरा घालून प्रत्येक जलंब वासियाची मान आज अभिमानाने उंचाविली आहे यात शंका नाही!

"जर प्रयत्नांना "सर्वस्व" दिले" तर "आव्हानांवरही "वर्चस्व" आपण गाजवू शकतो" याची अनुभूती देऊन जाणारे कार्य मंगलाताई यांच्या सरपंच कारकिर्दीत घडल्या आहेत.

सामान्य जनतेच्या कित्येक समस्यांचा अभ्यास करून त्या निराकरणासाठी आपण केलेले यशदायी प्रयत्न वाखाणण्याजोगे आहे. तुमचा आजवरचा जीवनप्रवास निश्चितचं ध्येयवेडा आहे.. गावातील प्रत्येक समस्या, अडचणी चे निराकरण करण्याची प्रामाणिक वृत्ती वेळ प्रसंगी स्व: खर्चातून.. केलेली कामे आणि एवढं सर्व करताना स्वभावातील शालीनता, निरपेक्षतः आणि निस्वार्थतः मन जिंकून घेते!

तुमचा, "सामान्य जनतेच्या हितासाठीचा पुढाकार....." "जगण्यातील दूरदर्शी विचार....." नी "आपले आदर्शवादी आचार...." यांचे पाईक होण्याची पात्रता व क्षमता महाराष्ट्रातील प्रत्येक भावी सरपंचास व कार्यकर्त्यास लाभो..

शेवटी नेतृत्व त्याच व्यक्तिचं सर्वमान्य असतं ज्यांच्या ठायी कर्तृत्व आणि दातृत्व असतं.. अश्या नेतृत्व, कर्तृत्व व दातृत्वाची अनुभुती आज अख्खा गाव याची देही याची डोळा... घेत आहे. याचाच परिणाम म्हणून सकाळ कडून मिळालेला पुरस्कार सदर पुरस्कार मिळवणाऱ्या आपण जलंब गावातील इतिहासातील प्रथम सरपंचा आहात हे सुद्धा अधोरेखित करावे लागेल

गावाला आलेला निधी सुद्धा त्याच हेड खाली नियोजनबद्ध खर्च करावा लागतो अनेकवेळा मात्र हा निधी खर्च न करता आल्यामुळे परत जाण्याची सुद्धा उदाहरणें आहेत मात्र ही सर्व यशदायी विकास कामे गावच्या एकी मुळे झाल्याचेही हे ही आपणास विसरता येणार नाही. यामध्ये ग्रा.प. सदस्यासोबतच दिवस रात्र एक करित लोकांच्या सेवेसाठी नेहमीच शार्थीचे प्रयत्न करणारे ग्रा. प. जलंब चे कर्मचारी तसेच गाव पातळीवर कार्यरत सर्व कर्मचारीवृंद व समस्त जलंबवासी यांच्याच सहकार्याने झाली आहेत...

अचुक नियोजन, कल्पक दुरदृष्टीकोन, आणि फलदायी " धोरण "..आदी अंगभूत गुणवैशिष्ट्यांमुळे आपण लोकांच्या जीवनांत "सुखसमृध्दीचे तोरण " अविरतपणे गुंफत आहात.. तुमच्या जनसेवेच्या या "अतुलनीय" ध्यासाला आमचा " आदरयुक्त "सोबतच या ध्यासाला हिमालयीन पर्वतीय उंची लाभो! आपल्या सभोवताली असणाऱ्या शुभेच्छांच्या लख्ख प्रकाशात एक छोटीसी पणती माझी ही मिणमिणते आहे याची सुद्धा जाणीव असावी.....याच अपेक्षेसह... आपल्या पुढील वाटचालीस अनंत शुभेच्छा...!!!



**अमोल काळे**

# कार्यकुशल नेतृत्व....सौ.मंगलाताई उत्तम घोपे

महिलांना समानतेचा दर्जा देतांना महिला सक्षमीकरणाचे धोरण राबवित असतांना हे कॉंग्रेसच्या कार्यकाळापासून आपण सर्व अनुभवत आहोत.दुर्बल समजल्या जाणारी ही महिला क्रांतिज्योती सावित्रीची लेक सर्वांगाने सक्षम व्हावी या शुद्ध हेतूने देशातील वरच्या स्तरापासून तर ग्राम स्तरापर्यंत सर्वच पदावर महिला सक्षमपणे काम करतांना आपल्याला दिसत आहेत.

खरं म्हणजे बुलडाणा जिल्ह्यातील उत्तरेत असलेल्या शेगाव तालुक्यात जलंब या गावी ९ फेब्रुवारी २०२१रोजी सौ. मंगलाताई घोपे ह्या मा.नानाभाऊ गव्हांदे यांच्या नेतृत्वात सरपंच पदी विराजमान झाल्या.आणि इथूनच विकासाचा झंझावात सुरू झाला .एखाद्या पुरुषाच्या मागे त्याच्या सहचारीनीची साथ असल्याशिवाय जसा तो राईचा पर्वत करू शकत नाही.तसाच एखाद्या स्त्रीच्या मागे तिचा जीवनसाथी भक्कमपणे उभा राहिल्या शिवाय आणि तिला वैचारिक स्वतंत्र दिल्याशिवाय ती अपेक्षित परिवर्तन घडवू शकत नाही. हाच धागा धरून उत्तमभाऊ घोपे यांच्या प्रामानिक साथीने या गावाचा कारभार सक्षमपणे सौ . मंगलाताई घोपे यांनी पाहिला . आणि शेवटच्या घटका पर्यंत सुद्धा विकास कार्य कसे पोहचवता येईल याचा प्रामानिक प्रयत्न केला.

उपलब्ध माहितीनुसार कार्याला वाहून घेण्याचा वसा त्यांनी जोपासला . गावातील नाली स्वच्छता असो नाली बांधकाम असो रस्ते बांधकाम समस्या असो रस्त्याचे रूंदीकरण असो गाव प्रकाशात राहण्याचा प्रश्न असो घन कचरा सांडपाण्याचा प्रश्न असो कोरोना काळात किंवा इतरत्र आरोग्या चा प्रश्न असो पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो घरपोच नळ - पाणी पुरवठा असो अपंग निराधार यांना मदत म्हणून भांडी वाटप असो .आर्थिक मदत असो शालेय विद्यार्थ्यांचा ड्रेस वाटप असो महिला बचन गटाला धैर्य आणी बळ देण्यासाठी कार्यक्रम असो . ग्राम पंचायत कार्यालयाचा विविध अंगाने विकास असो स्मशान भुमीला सर्व समावेशक रुप देवून तिचा विकास करणे पावसाळ्यात गाजर गवत फवारणी असो अशा प्रकारे गावाचा चेहरा मोहरा बदलविण्याचे सत्कर्म पुण्यकर्म करण्याचे कार्य सौ मंगलाताई उत्तम घोपे यांनी केले आहे .

सर्वधर्म समभावाची संकल्पना जोपासुन प्रत्येक संत महापुरुष यांच्या जयंती दिनी पुण्यतीथी दिनी ग्राम पंचायत कार्यालयात महामानवाच्या कार्याचा गौरव केला जातो . यामध्ये आमचे मार्गदर्शक श्री धामनकर गुरुजी, श्री सोनटक्के गुरूजी, संजयभाऊ गव्हांदे, विठ्ठल सोनटक्के आणि मी सुद्धा या संत महापुरुषांच्या कार्याचा गौरव करीत आहे . दि ११ एप्रील २०२३ रोजी ग्राम पंचायतच्या वतीने जिल्ह्यात पहिल्यांदा क्रांतीसुर्य म .फुले छ. शिवाजी महाराज विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती अभ्यास पूर्ण वक्ते बोलावून अभिवादन सभा घेवून महामानव आणि संताच्या कार्याला उजाळा देण्याचे काम सौ मंगलाताई घोपे यांच्या नेतृत्वात केले .

अशा प्रकारे चौकसपणे जागरूक पणे गावाचा सर्वांगीन विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे . सत्ता आज आहे तर उद्या नाहीं परंतू आपल्या विकासशील कृतीने गांव परिवर्तनाच्या दिशेने नेवून उत्तम प्रकारे विकास साधला आहे .

त्यांच्या भावी सामाजिक राजकिय वाटचालीसाठी खुप खुप शुभेच्छा व मंगल कामना प्रदान करतो . आणी भावी सरपंच सौ. दुर्गा सुरेश गव्हांदे यांना सर्व प्रकारे सर्वांच्या मार्गदर्शनाची व सहकार्याची अपेक्षा करतो.



**सुरेश गव्हांदे** (समाजसेवक)

भीमनगर, जलंब

# पारदर्शक कारभार, विकासाचा झंझावात व सोबतच सामाजिक एकोपा जपणाऱ्या सरपंच मंगलाताई

जलंब ग्राम पंचायतीचा एक सत्ता संपादनानंतरची वाटचाल आणि वर्तमान अवस्थेतील अडीच वर्षातील कारकीर्द जलंब वासियांसाठी मोलाची ठरली. अपवाद वगळता बरीच घोडदौड मंगलाताई घोपे सरपंच पदी आरूढ झाल्यानंतरचा कायापालट व त्यातील गावांच्या प्रतिक्रियेतील सार व खरोखरच गावात प्रगती झाली का? या विषयीचा आलेख तपासणे गरजेचे आहे.

तब्बल अडीच वर्षा अगोदर गावातील ग्राम पंचायतची सत्ता पंचवर्षा प्रमाणे जलंब गावातील नेते पॅनल प्रमुख माजी सरपंच आदरणीय नानाभाऊ गव्हांदे यांच्या नेतृत्वातील जलंब ग्राम पंचायतची सत्ता आरूढ झाली.गावाने गेल्या पंचवीस वर्षापासून याच म्हणजे वरील नेतृत्वावरच भरोसा केल्याने पुन्हा एकदा सत्तेची संधी दिली.

यात अनुसूचित जातीचे आरक्षण निघाल्याने प्रथम संधी आदरणीय उत्तमजी घोपे यांच्या सुविद्य पत्नी मंगलाताई घोपे यांना देण्यात आली. त्यांचे पती उत्तमजी घोपे अगोदरच सामाजिक, धार्मिक क्षेत्रात काम करत असल्याने तथा सत्संगाचा व्यासंग असल्याने गावात काहीतरी नवीन केले पाहिजे हा मनाशी ध्यास धरून गावात सरपंचपदाचा झंझावात सुरु झाला. त्यात मंगलाताईच्या नेतृत्वात गावातील अनेक विकासात्मक कामांना हात घालुन पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नात जो अनियमितपणा होता तो दूर करून त्यातील दहा दिवसावरील नळाचा कालावधी सात दिवसावर आणला. गावातील रोड आणि त्याची उपयुक्त काळजी घेऊन ज्या ठिकाणी ज्याची गरज आहे त्या रोडला प्राधान्य दिले. कायमस्वरूपी पाणी योजनेसाठी प्रयत्न करून तथा त्या R.O.पद्धतीचे काम पाईपलाईन करून गावात क्रांतीचे बीजारोपण केले. घरकुल लाभार्थीतील ज्या खरे लाभार्थी आहेत अशांनाच प्रथम प्राधान्यक्रम देऊन तथा उपेक्षित वर्ग जसे मातंग, बौद्ध, चांभार या रमाई योजनेतील लाभार्थी यांचे योजनेबद्दल पारदर्शकता ठेऊन समान न्यायासाठी प्रयत्न केला.

गावातील स्मशान भूमीचा रस्ता,स्मशानभूमीसाठीच्या विकासासाठी ग्राम पंचायत कडुन कुठलीही कमतरता पडू दिली नाही.सर्व महापुरुषांच्या सन्मानार्थ विविध कार्यक्रम तथा त्यासाठी कुठलाही निधी कमी पडू दिला नाही.छत्रपती शिवाजी महाराज,राष्ट्रपिता ज्योतिबा फुले,डॉ बाबासाहेब आंबेडकर,राष्ट्रसंत जगनाडे महाराज,राष्ट्रसंत तुकाराम महाराज, राष्ट्रसंत रविदास महाराज, वीर महाराणा प्रताप,या संतांचा तथा महापुरुषांचा सन्मान करून गावात एकोपा ठेवण्यासाठी सर्व धर्म समभाव भावना जोपासली.या अगोदर असे खरच पारदर्शक सरकार जलंब गावात पाहायला मिळाले नाही. स्वच्छतेचे एक पाऊल पुढे टाकत गावात कचरा गाडीचे निर्माण करून गावात स्वच्छतेचे पाऊल उचलले.अशा अनेक कामांना गती देत हे मंगलाताईच्या नेतृत्वातील सत्ता तथा समाजिक कार्यकर्ते उत्तमजी घोपे यांचे कुशल नेतृत्व धडपड पाहायला मिळाली..

डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा परिसराच्या सौंदर्यीकरणासाठी एक महत्वाचे पाऊल उचलून ग्राम पंचायत आणि स्वत: ही मदत केली.सुसज्ज ग्राम पंचायत चा चेहरा मोहरा बदलवून टाकला.त्याचेही बदल लोकांना दिसत आहेत.

अशात काही कामांमध्ये अनियमित्त सुद्धा आली.धातुरपणा तथा करायचे म्हणुन करायचे असे ठेकेदार नियुक्त करून जे नवीन रोड टाकलेत त्यामध्ये ठिसूळपणा दिसतो. कामं भरपूर केली यात शंका नाही.परंतु हेही सांगणे गरजेचे आहे. विविध योजना आणण्यासाठी प्रशासकीय स्तरावर वाटेल ते करावे लागते हा अविर्भाव आणुन काही कमांमध्ये मनमानीही झाल्याचे दिसते. एकंदरीत गावाचा आलेख जर तपासला तर हे अडीच वर्षापूर्वी दाखल झालेले सरकार सत्ता गावाच्या विकासासाठी झटले एवढे मात्र खरे ! ऊत्तमभाऊ घोपे यांची धडपड अत्यंत वाखाणण्यासारखी वाटली....ग्राम पंचायत तथा गावातील जनता हे कदापिही विसरणार नाही.

आपणास मी भरभरून शुभेच्छा देतो. गावातील भविष्यातील त्रुट्या आपण काढण्यायोग्य व्यक्तिमत्व आहात. आपले पॅनल योग्य दिशादर्शक पॅनल आहे. गावच्या तमाम जनतेने आपणास स्वीकारलेले आहे. आपण निश्चित एक उत्तम प्रशासक एक उत्तम कार्यकर्ते आणि नावाच्या उत्तमातच उत्तम आहे ...

विद्यमान सरपंच मंगला ताईस माझ्याकडून पुनश्च एकदा मनापासुन शुभेच्छा...

आपले मनापासुन आभार....



**भाई बाबुराव सरदार**

जलंब गावातील विचारवंत, वक्ता

## ग्रामपंचायतीच्या कारभारात लोकसहभाग हा महत्वाचा !

जलंब गावातील प्रथम नागरिक सरपंच सौ मंगलाताई उत्तमरावघोपे यांनी आपल्या ३० महिन्याच्या कारकिर्दीमध्ये जलंब ग्रामपंचायत चे नाव शेगाव तालुक्यामध्ये भ्रष्टाचार मुक्त करून दाखवले. "गावाची सेवा हाच धर्म" त्यांनी गावांमध्ये विकास करताना संपूर्ण गावामध्ये पाचही वार्डामध्ये सारखी काम केली. त्यांनी प्रत्येक समाजातील घटकांना न्याय मिळवून देण्याचा पुर्ण प्रयत्न केला. इतके कामे पाच वर्षात करू शकत नाही तेच कामे सरपंच सौ.मंगलाताई घोपे यांनी अडीच वर्षात करून दाखवली.

असा सरपंच लाभणे जलंब गावाचे भाग्यच आहे. याच्यापुढेही नवीन सरपंचाकडून गावकऱ्यांना हीच अपेक्षा आहे. प्राथमिक शिक्षणावर ग्रामपंचायतीने मोठा भर दिला आहे. त्यामुळे गावात १००% ने साक्षरतेचे प्रमाणे वाढले. इथे एक गोष्ट आवर्जून नुमद करावीशी वाटते, सरपंचामध्ये कीतीही चांगले गुण असले तरीही त्याला गावकऱ्यांच्या सहभागा शिवाय काहीच करता येत नाही. त्यामुळे गावातील लोकांनी त्याला प्रतिसाद देणं, प्रोत्साहित करणंही तितकंच आवश्यक असतं.



लोकांनी ग्रामपंचायतीच्या कारभारात व ग्रामसभेत आवर्जून सहभाग घेतला पाहिजे. गावाच्या विकासाचा भार एकट्या सरपंचावर देऊन गाव कधीच समृद्ध होऊ शकणार नाही. हे देखील तितकेच खरे..! त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारात लोकसहभाग हा महत्वाचा ठरतो

आपल्या हातुन भविष्यात जलंब गावाचा विकास असाच घडत राहो हीच शुभेच्छा !

**संजयसिंग सोनसींग राजपुत**

## आरसा कर्तुत्वाचा !

उजालो की राह पर चले, अंधेरोसे डरे नही ! आयी कितनी भी मुश्किले, मगर सपने उनके बिखरे नही !

गेल्या अडीच वर्षापासून जलंब गावामध्ये सर्वांगीण विकासाची पताका डोलाने फडकत आहे. एक स्त्री आपल्या कर्तुत्वाची नेतृत्वाची आणि दातृत्वाची चमक आपल्या विकास कामांमधून जलंब वासियांना अनुभूती देत आहे. अशा जलंब गावच्या प्रथम नागरिक व सौ. मंगलाताई उत्तम घोपे यांचे सर्वप्रथम अभिनंदन! गावातील समस्यांचा अचूक वेध घेत गावकऱ्यांच्या मनाचा ठाव घेऊन कायमस्वरूपी समस्या सोडवण्याची सोडवण्याची त्यांची हातोटी मनाला भिडणारी आहे. विविध योजनांचा अभ्यास करून गावाकरिता निधी खेचून आणण्यासाठी लागणारे कसब निराळेच.

कोट्यावधीची कामे गावात करत असताना कधीही गाजावाजा न करता श्रेयवादासाठी न हपापता साधे सरळपणाने सर्वांना सोबत घेऊन सर्व घटकांना न्याय देणे हे सर्व अनाकलनीय वाटत होते पण आपल्या दूरदृष्टीने हे सर्व साध्य करून विकास काय असतो हे दाखवून देत अमरावती विभागातील "सकाळ आयडॉल सरपंच पुरस्कार" मिळवणे हा प्रवास तसा स्वप्नवतच पण ताईंनी तो प्रत्येक प्रत्यक्षात आणला आणि गावाचा नावलौकिक वाढविला.



कोणतेही राजकीय पाठबळ नसताना, कोणताही राजकीय वारसा नसताना गावकऱ्यांच्या सहकार्याने व अधिकारी वर्गाच्या मदतीने विकासाचा डोलारा उभारला गावाचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम सरपंचांच्या माध्यमातून झाले. झालेल्या अनेक विकास कामांची माहिती आपणास या पुस्तकातून मिळत आहे . आदर्श पारदर्शक कारभार काय असतो याचा उत्तम नमुना सर्व जलंबवासी आज अनुभवत आहेत. आदरणीय ताईना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा !

शेवटी एवढेच म्हणेल
सपने तुटे है मगर हौसले अभी जिंदा है !
ये वो हस्ती है जहा मुश्किले शर्मिंदा है !

**किसनराव बाबाराव देशमुख**

माजी उपसरपंच जलंब

## ग्राम विकास हाच ध्यास ठेवणाऱ्या सरपंच सौ. मंगलाताई

गेल्या काही वर्षापासून ग्रामीण स्तरावर विकासाची कामे करणे हे मोठे दिव्य होऊन बसले आहे. बदललेला राजकारणाचा स्तर आणि वैयक्तिक लाभ कसा होईल याकडेच अनेकांचे लक्ष असल्याने सार्वजनिक कामे करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्या पार्श्वभूमीवर सौ. मंगलाताई यांनी केलेली विकासकामे विशेषत्वाने दखल घेण्यासारखी आहेत. त्यांचे पती उत्तम घोपे यांच्या सत्संगी वृत्तीमुळेच ताईना विकास कार्यासाठी बळ मिळाले आहे. पत्रकाराच्या दृष्टीने पाहिले असता एवढ्या कमी काळात अश्या पद्धतीची कामे आपल्या जिल्ह्यात कोणत्याच ग्राम पंचायत मध्ये झाली नसतील. हा आदर्श इतर गावांनाही घ्येण्याची गरज आहे. अशा पद्धतीने काम करणाऱ्या व्यक्तींना गावकऱ्यांची साथ नेहमी लाभली तर गावाचा संपूर्ण कायापालट होऊ शकतो.



मंगलाताईना भविष्यासाठी व राजकीय वाटचालीसाठी मी शुभेच्छा देतो !

**बबलु देशमुख**

लोकमत रिपोर्टर

## अडीच वर्षात उत्तम कामगिरी !



आपल्या गावातील प्रथम नागरिक गावाच्या सरपंच सौ मंगलाताई उत्तम घोपे यांच्या अडीच वर्षाच्या काळातील उत्तम कामगिरीबद्दल अतिप्रसन्न आहे. त्यांनी प्रामाणिकपणाने कामे केले आहे तसेच त्यांच्या चांगल्या कामगिरीचे उदाहरण म्हणजे गावातील स्वच्छता, विकास, पाणी पुरवठा, घंटागाडी, पथदिवे, रस्त्याची विकास कामे केली याबद्दल मी अतिप्रसन्न आहे. मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

**रामेश्वरदादा भगवान मोहे**

माजी उपसरपंच जलंब

सदस्य नानाजी देशमुख समिती जलंब, सदस्य ग्राम सेवा सहकारी सोसायटी जलंब

कार्यकारिणी सदस्य श्री. पाई विद्यालय जलंब

## मंगलताईंचा कार्यकाळ प्रभावी व यशस्वी राहिला

खेड्यांचा देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारत देशात एकूण लोकसंख्येच्या 65.53% लोक गाव खेड्यात राहतात. स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे उलटून गेली. शहरांची झपाट्याने प्रगती झाली त्या प्रमाणात खेड्यांचा विकास झाला नाही. 73 व्या घटनादुरुस्तीनंतर ग्रामपंचायतींना सक्षम होण्यासाठी मोठ्या प्रमाणात अधिकार प्रदान करण्यात आले त्यामुळे सरपंच यांनी ठरवले तर आपल्या गावाचे नंदनवन करण्यासाठी जास्त वेळ लागत नाही मात्र सर्वप्रथम त्यांनी तसे ठरवणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी गावाच्या विकासाचा ध्यास घेऊन जिद्द चिकाटीने काम केल्यास नक्कीच मार्ग सापडतो.

गावाचे नंदनवन झालेली पाटोदा गाव, हिवरे बाजार व राळेगणसिद्धी या गावाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून गावात वीज पिण्याचे पाणी चांगले रस्ते उत्तम शिक्षण व आरोग्य स्वच्छता यावर भर देऊन जलंब ग्रामपंचायतच्या सरपंच सौ मंगलाताई उत्तम घोपे यांनी अत्यंत कमी कालावधीत लोकनियुक्त सरपंच म्हणून लोकांनी दाखविलेला विश्वास योग्य होता हे सिद्ध करून दाखविले यात शंका नाही.

आज जलंब गावामध्ये पाणीपुरवठा योजना असेल बचत गटांना प्रोत्साहन देऊन ग्राम संघासाठी जागा व व्यवसायासाठी मदत उत्तम दर्जाचे रस्ते, हायमास लाइट्स, ग्रामपंचायतचे उत्पन्न वाढीसाठी आर.ओ.कॅन, स्वच्छता व आरोग्य यासाठी अत्यंत सटीक नियोजन, प्लास्टिक पुनर्वापर प्रकल्प , सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन यावर सौ मंगलाताई यांनी सरपंच म्हणून ठेवलेले उत्तम नियंत्रण यामुळेच त्यांचा कार्यकाळ हा अत्यंत प्रभावी , यशस्वी राहिला आहे. त्यांचे हातून असेच उत्तम उत्तम कार्य घडत राहो हीच सदिच्छा व त्यांचे भावी उज्वल वाटचाल साठी अनंत शुभेच्छा!



**सतीश देशमुख**

प्रशासक तथा गटविकास अधिकारी , पंचायत समिती शेगाव

## राजकीय मतभेद दूर ठेवत गावाचा सर्वांगीण विकास

सस्नेह नमस्कार! सर्वप्रथम आपले दि. 9 फेब्रुवारी 2021 ते 27 मे 2023 या कालावधीत आपण आपल्या जलंब गावाची धुरा एक महिला सरपंच म्हणून यशस्वीरित्या सांभाळली त्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन! खरोखरच आपणास मिळालेल्या या संधीचे आपण आपल्या गावच्या विकासासाठी सोने करून गावात ग्रामपंचायत पातळीवर विकास घडवून आणला. आपण एक यशस्वी महिला सरपंच म्हणून नावारूपास आलात. आपला आदर्श इतर महिलांनी घ्यावा असेच वाखाणण्याजोगे काम आपण आपल्या सरपंच पदाच्या काळात केलेले आहे.

राजकीय मतभेद बाजूला ठेवून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी खरोखर आपण प्रयत्न केलेत आणि त्यात आपण यशस्वी झालात. आपल्या या सरपंच पदाच्या कालावधीत आपणास आपले पती आदरणीय श्री. उत्तमभाऊ घोपे यांचे यथोचित मार्गदर्शन लाभले आणि त्यांचे भक्कम असे समर्थन आपणास मिळाले त्यामुळेच आपण काही नवनवीन प्रयोग गावात राबू शकलात. आपल्या सरपंच पदाच्या काळात आपल्या गावामध्ये नागरिकांना आर. ओ. फिल्टर पाण्याची सुविधा आपण उपलब्ध करून दिली त्याबद्दल सुद्धा आपले अभिनंदन! आपल्या देशाचे पंतप्रधान आदरणीय श्री नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या स्वच्छतेच्या संकल्पनेला सुद्धा आपण साथ देत आपल्या गावामध्ये कचराकुंडी आणि घंटागाडीची व्यवस्था करून दिली त्याबद्दल सुद्धा आपले अभिनंदन !आपल्याला मिळालेल्या सर्व सन्माननीय ग्रा. पं. सदस्यांची साथ आणि पती उत्तमभाऊ घोपे यांनी आपणास दिलेला पाठिंबा या सर्वांचे सुद्धा मी मनापासून अभिनंदन करतो. शेवटी एवढेच सांगतो की आपला हा सरपंच पदाचा प्रवास जलंब गावाच्या कायम स्मरणात राहील. आपणास भावी राजकीय वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!



**दिलीप दामोदर शेजोळे**

माजी सरपंच

सौ. मंगलाताई घोपे यांच्या सरपंच पदाचा कार्यकाळ हा विकासाच्या दृष्टीने जलंब गावासाठी सुवर्ण काळ ठरला आहे. ज्या वेगाने अनेक विकास कामे पूर्णत्वास गेली ती गती अविश्वसनीय आहे.

सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य, रस्ते, पाणी पुरवठा, नागरी सुविधा, ग्राम सौंदर्यीकरण अशा सगळ्याच क्षेत्रात भरीव काम झाले. शासन आणि प्रशासन या दोन्हीवर उत्तम नियंत्रण ठेवत जलंब गावासाठी एक आदर्श सरपंच म्हणून त्यांचे नाव घेतल्या जाईल.



**गजानन सुखदेव असंबे**

जलंब गावच्या प्रथम नागरिक म्हणुन गावाच्या विकासा साठी आपण आपले १०० टक्के प्रामाणिक प्रयत्न केल्यामुळे आज गावाचा चेहरा मोहरा बदलताना दिसत आहे,असेच भविष्यात सुध्दा विकास कामे होतील हीच सदीच्छा!

**-आर. जे. पाचपोर**

पाणीपुरवठा विभागीय अधिकारी खामगाव



## सरपंचांनी विकास कामे संपन्न करून एक आदर्श निर्माण केला

सहकार्य आणि सत्कर्म आवाज न करता केले तर त्यातून निर्माण होणारे माधुर्य आणि समाधान हे अतुल्य असते. आयुष्यात अशाच माणसांना निवडा जी सुखात आपल्या मागे आणि दुःखात आपल्यापुढे असतील. जीवनात सुखाचे दुःखाचे, यशाचे -अपयशाचे, आशेचे - निराशेचे अनेक प्रसंग येतात पण विचाराचा भक्कम पाया असणारी माणसे लढण्यासाठी प्रसंगी ठामपणे उभे राहतात हा मूलमंत्र माझे गुरु परम आदरणीय महादेवराव गव्हांदे यांनी 1989 मध्ये या गटाला दिला व जे रोपटे त्यांनी लावले ते आज भव्य वटवृक्ष झाले.

गटातील सर्व निष्ठावंत कर्तृत्ववान सेवा वृत्तीचे सहयोगी यांना या विकासात मोलाचा वाटा आहे व या विकासरुपी वटवृक्षाचे जतन करून सर्व सहकारी स्वतः ज्यांनी 1989 ते 2023 पर्यंत केले ते आदरणीय नानाभाऊ गव्हांदे यांनी आपल्या कार्यकुशलतेने व कुशल राजनीतीने यशस्वीरीत्या आतापर्यंत पार पाडले . आज सरपंच सौ मंगलाताई घोपे आणि उत्तम घोपे यांनी अतिशय निस्वार्थ व कार्य कुशलतेने जलंब गावात अनेक विकास कामे संपन्न करून एक आदर्श निर्माण केला. यापुढेही या गटाचे हे विकास कार्य समाजसेवा यांच्या हातून यशस्वीरित्या होत राहील अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.



**डॉ. आर. के. राजपूत**
**जलंब**

## सौ. मंगलाताईंनी विकासाची गंगा तळागाळात पोहोचवली !

कोणत्याच प्रकारची राजकीय पार्श्वभूमी नसताना आमच्या जलंब गावाच्या आदरणीय सरपंच सौ मंगलाताई उत्तमराव घोपे यांनी अतिशय कमी कालावधीत मिळालेले संधीचे सोने प्रत्यक्ष कृतीद्वारे करून गावचा विकास कसा करता येऊ शकतो हे त्यांनी केलेल्या कार्यातून सिद्ध करून दाखविले.

गावचा विकास या एकाच ध्येयाने प्रेरित होऊन अतिशय कल्पकतेने विश्वासाने थोरांपासून ते तळागाळातील सर्वांना सोबत घेऊन कोणत्याच प्रकारचे राजकारण न करता त्यांनी आमच्या छोट्याशा जलंब गावचा विकास करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला.

गावचा विकास हेच त्यांचे अंतिम ध्येय व त्यासाठी त्या अहोरात्र झटल्या. थोडक्यात विकासाची गंगा त्यांनी तळागाळातील सर्वांपर्यंत पोहोचवली. त्यांनी केलेल्या कार्याला माझे शतशः नमन व पुढे सुद्धा असेच समाज उपयोगी कार्य सतत त्यांचे हातून घडत राहो हीच प्रभू चरणी माझी प्रार्थना.



**श्री अनिल लक्ष्मण सोनटक्के**
सचिव श्रीपायी शिक्षण संस्था जलंब
सेवा निवृत्त मुख्याध्यापक

## मुलांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करणाऱ्या सरपंच

सन 2022-23 या शैक्षणिक वर्षात ग्रामपंचायत जलंब यांच्या कडून जि.प.मराठी प्राथमिक मुलांची शाळा जलंब येथे,1लोखंडी ऑफिस कपाट, मुख्याध्यापक यांच्यासाठी व्हील खुर्ची, अध्यक्ष यांच्यासाठी 1खुर्ची, 7फायबर खुर्च्या, बिगरमागास मुलांना शालेय गणवेश मिळाला आहे.

तसेच सरपंच सौ.मंगलाताई उत्तम घोपे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील मुलांना 100 रायटिंग पॅड मुलांना भेट दिले. याबाबत मी आपला ऋणी आहे.जिल्हा परीषद शाळेतील मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक भौतिक सुविधा ग्रामपंचायत कार्यालय जलंब उपलब्ध करून देवून मुलांचा सर्वांगीण विकास करण्यात आम्हाला सहकार्य राहील ही मला खात्री आहे.



**श्री.पहुरकर सर** ( मुख्याध्यापक )
जि.प.मराठी प्राथमिक
मुलांची शाळा जलंब

## जनसेवा ही व्रताप्रमाणे केली !

माननीय सरपंच सौ मंगलाताई उत्तम भाऊ घोपे यांना माझा आदरणीय नमस्कार!

सरपंचताई तुम्ही गावासाठी शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले तसेच गावात घंटागाडीची सोय केली . स्मशानभूमीचे सौंदर्यीकरण, रस्ताची कामे, गावांमध्ये झाडे लावा झाडे जगवा, कानाकोपऱ्यात वीज पुरवठा पोचून गावात जागोजागी लाईटची व्यवस्था केली. लोकांसाठी आरोग्य शिबिर आयोजित केले. गावातील कोरोना लसीकरणाची जबाबदारी तुम्ही व्यवस्थित पार पडली. "उतू नये मातू नये घेतला वसा टाकू नये" या म्हणीप्रमाणे तुम्ही तुमची कामगिरी एखाद्या व्रताप्रमाणे पार पडली. तुमच्यासाठी देवापुढे हीच प्रार्थना आहे की देव तुम्हाला तुमच्या पुढील जीवनात सुद्धा जनसेवा करण्याची संधी देवो हीच मनापासून सदिच्छा!



**सौ.विजया सतीश सोनटक्के**
जलंब गावातील एक महिला

## महिला सक्षमीकरणासाठी साथ देणाऱ्या सरपंच

नमस्कार मी मालू देशमुख उमेद समूह संसाधन व्यक्ति म्हणून काम करते. ग्रामपंचायत म्हणजे त्या गावचे कुटुंब आणि सरपंच म्हणजे कुटुंब प्रमुख जर व्यवस्थित असेल तर ते कुटुंब प्रगतीपथावर जाते. ग्रामीण भागात महिला आणि ग्रामपंचायत यांचा दुर दुरपर्यंत संपर्क नसतो पण या पंचवार्षिक मध्ये आम्हा महिलांसाठी ग्रामपंचायत म्हणजे जणू हक्काचे घरच झाले. आमची कोणतीही अडचण जरी असली तरी सरपंच यांना सांगितल्यावर लगेच त्यांनी अर्जंट सोडविली. महिलांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम या काळात घेतल्या गेले. गावांमध्ये एकूण 95 महिला बचत गट असून तीन ग्राम संघ आहेत या ग्राम संघांना ऑफिस नव्हते मीटिंग घ्यायच्या व्यवस्था नव्हती तर आमची ती भटकंती थांबून आम्हाला ग्रामपंचायतने जागा उपलब्ध करून दिली. गावात कचरा पेट्या बसवून घंटागाडी चालू केली. गावात रस्ता दुरुस्ती केला. नाविन्यपूर्ण वेगवेगळ्या प्रकारचे विकास कामे या काळात ग्रामपंचायतीने केले. आम्ही महिलांनी आयोजित केलेल्या प्रत्येक कार्यक्रमात ग्रामपंचायतीने सहकार्य केले. एकंदरीत आतापर्यंत बघता खूप चांगले विकास कामे ग्रामपंचायतने केले व काही बाकी आहेत .जे बाकी आहे ते सुद्धा पूर्ण करतील अशी आशा आहे. गावचा विकास हा त्या गावातील महिलांच्या सक्षमीकरणावरून ठरविला जातो ह्या महिला सक्षमीकरणाचा वसा जो मी घेतला आहे तो पूर्ण करण्यासाठी ते भविष्यात सुद्धा सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे.

जय जिजाऊ ! जय सावित्री ! जय उमेद ! जय जय उमेद !



**सौ. मालू गुणवंतराव देशमुख**

उमेद समूह संसाधन व्यक्ती जलंब , उमेद महिला कल्याणकारी मंडळ

शेगाव तालुका अध्यक्ष व जिल्हाध्यक्ष

## आधी केले मग सांगितले !

आधी केले मग सांगितले असे संत वचन आहे ! त्या वचनानुसार कृती करत सौ. मंगलाताई घोपे यांचा कार्यकाळ पूर्ण झाला. गावातील समस्या सोडवू असे कोरडे आश्वासन त्यांनी न देता प्रत्यक्ष कामे करून दाखविली. त्यामुळे अपलावधीतच गावकऱ्यांना आपल्याला एक उत्तम सरपंच लाभला असल्याची जाणीव झाली. फक्त शासकीय निधीच वापर करूनच कामे न करता वेळप्रसंगी स्वतः पुढाकार घेऊन पदरमोड करीत अनेक कामे केली. गावकऱ्यांनी त्यांच्याकडे गाऱ्हाणे नेण्याची वेळ त्यांनी कधीच येऊ दिली नाही. कारण दिवसभर गावातील वेगवेगळ्या भागात फिरून स्वतःच समस्या जाणून घेण्याची त्यांची कार्यशैली होती. येणाऱ्या काळात त्यांना अशीच जनसेवेची संधी मिळत राहो ही सदिच्छा !



**प्रशांत देविदास फंदाट**

सदस्य नानाजी देशमुख समिती जलंब

## आपले गाव स्वच्छ , सुंदर आणि समृद्ध करण्यासाठीया गोष्टी करा

१ ) ग्रामपंचायत घरपट्टी , पाणीपट्टी वेळेवर भरा .
२ ) तुमचे घर व आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवा .
३ ) नियमित शौचालयाचा वापर करा .
४ ) घरासमोर स्वत : च्या जागेत किमान २ झाडे लावा .
५ ) सांडपाणी रस्त्यावर सोडू नका .
६ ) तुमच्या घरासमोरील सार्वजनिक विद्धुत लाईटची बटणे दिवसा बंद करा .
७ ) नळाला तोटी लावा पाणी वाया घालु नका .
८ ) सार्वजनिक जागा , रस्ते , यावर अतिक्रमण करू नका
९ ) आपल्या गावच्या भल्यासाठी चांगली कामे , विचार ग्रामपंचायतीला सुचवा , त्यात सहभागी व्हा

**बदल घडवा ,**
**बदलाचे साक्षीदार व्हा !**



**ग्रामसभेत नियमित सहभागी व्हा !**

**आपला हक्क ! आपला आवाज**

**लोकसहभागातून होईल विकास !**

ग्रामपंचायतीने आयोजित केलेल्या कोणत्याही ग्रामसभेस गावच्या मतदाराना उपस्थित राहण्याचा अधिकार आहे. सभेच्या अध्यक्षाला प्रश्न विचारण्याचा, एखाद्या विषयासंदर्भात मत मांडण्याचा अधिकारही मतदाराला आहे.

# जलंब गावातील विविध विकासात्मक कार्याची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल

सकाळ

# 'सकाळ आयडॉल्स ऑफ महाराष्ट्र' सन्मान सोहळा आज

## अमरावतीत 'सरपंच अवॉर्ड' व 'पॉलिटिकल आयकॉन' पुरस्काराने होणार गौरव



डॉ. दिलीप पांढरपट्टे



डॉ. सुनील देशमुख



अरुण वरणगावकर

- स्थळ : हॉटेल गौरी इन, अमरावती.
- दिनांक : बुधवार १२ ऑक्टोबर २०२२
- वेळ : दुपारी १२.०० वाजता
- निमंत्रितांनाच प्रवेश

**सकाळ वृत्तसेवा**

अमरावती, ता. ११ : आपल्या कार्यकर्तृत्वाने शहर व गावांच्या विकासात योगदान देत सामाजिक तथा राजकीय क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतलेल्या मान्यवरांचा बुधवारी (ता.१२) 'सकाळ आयडॉल्स ऑफ महाराष्ट्र'मध्ये पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.

अमरावतीच्या नागपूर महामार्गावरील हॉटेल गौरी इन येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा होणार आहे. अमरावतीचे विभागीय आयुक्त डॉ. दिलीप पांढरपट्टे, माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, ज्येष्ठ उद्योजक अरुण वरणगावकर यांच्या हस्ते 'सरपंच अवॉर्ड' व 'पॉलिटिकल आयकॉन'सह राजकीय क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराचे वितरण होणार आहे. अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलडाणा व वाशीम जिल्ह्यांमध्ये जनसेवेचे कार्य करून आपली नवी ओळख निर्माण केलेल्या मान्यवरांचा पुरस्काराने गौरव यावेळी करण्यात येणार आहे.

'सकाळ माध्यम समूह' नेहमीच समाजातील सकारात्मक ऊर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करीत असतो. शहर व ग्रामीण भागात विकासासाठी सातत्याने काम करीत पायाभूत सुविधांबाबत जनतेला न्याय मिळवून देणारे नगरसेवक, माजी नगरसेवक, सरपंच तसेच समाजासाठी झटणाऱ्या आगळ्यावेगळ्या व्यक्तिमत्त्वांचे कौतुक केल्यास त्यांना नवी ऊर्जा मिळते व त्यांच्या कार्यापासूनच समाजातील इतर घटकांनाही नवीन प्रेरणा मिळते. अशांच्या कार्याची दखल 'सकाळ' नेहमीच घेत आला आहे. त्यांचे शहर, गाव, समाजासाठी अमूल्य योगदान आणि त्यांच्या यशोगाथा समाजापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी सर्वांची आहे. याचाच एक भाग म्हणून विविध क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यासाठी 'सकाळ'ने पुढाकार घेतला आहे. त्या अंतर्गत 'सरपंच अवॉर्ड' व 'पॉलिटिकल आयकॉन' पुरस्काराने मान्यवरांचा गौरव होणार आहे.

सकाळ

# लोकप्रतिनिधींच्या कर्तृत्वाचा 'सकाळ'कडून सन्मान



अमरावती : 'सकाळ आयडॉल्स ऑफ महाराष्ट्र' पुरस्काराचे बुधवारी (ता. १२) शानदार सोहळ्यात थाटात वितरण करण्यात आले. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. दिलीप पांढरपट्टे, माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, ज्येष्ठ उद्योजक अरुण वरणगावकर, 'सकाळ'च्या विदर्भ आवृत्तीचे कार्यकारी संपादक संदीप भारंबे, सहायक महाव्यवस्थापक (जाहिरात) सुधीर तापस यांच्यासह विविध जिल्ह्यातील सरपंच व पॉलिटिकल आयकॉन्स.

(अधिक वृत्त पान ३ वर)



सकाळ

SARPANCH AWARDS

# सर्वसमावेशक भूमिका असलेल्या जलंबच्या

# सरपंचा सौ. मंगलाताई उत्तम घोपे

SARPANCH AWARD



सौ. मंगलाताई उत्तम घोपे,
सरपंच, जलंब ता. शेगाव.
जी. बुलडाणा

गावचा विकास म्हणजे फक्त गावठाण अंतर्गत बांधणे नाही तर ग्रामपंचायत गावठाणमधील सर्व वाड्या-वस्त्यांमधील पायाभूत सुविधांचा विकास. कोणतीही छोटी वाडी व वस्ती वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली गेली. ग्रामपंचायत क्षेत्रात येणाऱ्या सर्व व्यक्तींचे आरोग्य, शिक्षण व दरडोई उत्पन्न म्हणजे विकास. महिला, बालके, अनुसूचित जाती-जमाती, भटक्या जमाती, अल्पसंख्याक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक सगळ्यांचा विकास. ग्रामपंचायतीच्या परिसरातील व अखत्यारीतील सर्व नैसर्गिक संसाधनांचा जल, जंगल, जमीन, जनावरे यांचा विकास अशी सर्वसमावेशक भूमिका महिला सरपंचा **सौ. मंगलाताई उत्तम घोपे** यांनी घेतली आहे.





ग्रा[illegible]

### एका वर्षात गावाचा विकास

[illegible]





[illegible]

# जलंब येथे प्रजासत्ताक दिन साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**जलंब** ■ स्थानिक जलंब पोलीस स्टेशनच्या प्रांगनामध्ये सकाळी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व प्रथम भारतमाता व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे ठाणेदार धिरज बांडे यांच्या हस्ते पुजन करून ध्वजारोहण करण्यात आले. तसेच या वेळी संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाला पीएसआय राहुल कातकाडे, पोलीस कर्मचारी गोविंदा व्हानमाने, दिनकर तिडके, संदिप शित्रे, तुकाराम इंगळे, मोहन आडेकर, राजेश राजगुरे, राहुल वाघ, सुभाष चोपडे, गोपाल शिंदे, शेख अजुंम आदी उपस्थित होते.

**जलंब ग्रामपंचायत कार्यालय :** येथील ग्रा.पं. कार्यालयामध्ये २६ जानेवारी रोजी सकाळी ७३ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व प्रथम ग्रा. पं. सरपंच सौ. मंगलाताई घोपे यांच्या हस्ते भारत मातेच्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाला उपसरपंच सौ. पल्लवी सोनटक्के, ग्रामविकास अधिकारी सुभाष काळे, सरपंच पती उत्तम घोपे, तलाठी ढोकणे, ऐनवार सर्व ग्रामपंचायत सदस्य गण, कर्मचारी वृंद, ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

देशोन्नती

# जलंब कार्यालयामध्ये शिवराज्यभिषेक दिन साजरा



**जलंब** ■ स्थानिक ग्रा.पं.कार्यालयामध्ये ६ जुन रोजी शिवराज्याभिषेक दिन हा शिवराज्य गुढी उभारून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.सर्वप्रथम ग्रा.पं.सरपंच सौ.मंगलाताई घोपे ... वत ... च्या ... ज्य ... ाश ... डे, ... दे, ... ास ... शी, ... वचे ... थत

# जलंब ग्रामपंचायत कार्यालयामध्ये राजमाता मॉसाहेब जिजाऊ जयंती साजरी

देशोन्नती वृत्तसंकलन...

**जलंब** ■ येथील ग्रा.प कार्यालयामध्ये राजमाता मॉसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम मॉसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे ग्रा.प सरपंच सौ मंगलाताई घोपे यांच्या हस्ते विधिवत पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला तसेच उपस्थित सर्व मान्यवरांनी सुद्धा पूजन केले.

कार्यक्रमाला सरपंच सौ मंगलाताई घोपे, उपसरपंच महेश गव्हांदे, ग्राप सदस्य प्रकाश देवचे, गोपाल मोहे, सरपंच पती उत्तम घोपे, रामेश्वर मोहे, ग्रा पं कर्मचारी केशव देशमुख, गणेश देवचे, सुरेश देवचे, राजेश गव्हांदे, अनिल कंठाळे यांच्यासह ग्रामस्थ मंडळी उपस्थित होती. उल्लेखनीय बाब म्हणजे येथील ग्रा.प कार्यालयामध्ये सरपंचा सह ७ महिला ह्या ग्रा.पं. सदस्य म्हणून निवडून आलेल्या आहेत.

मात्र आज झालेल्या राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीला



सरपंच सौ मंगलाताई घोपे वगळता एकही महिला ग्रा. पं सदस्य ह्या जयंती साजरी करण्यासाठी ग्रा पं कार्यालयामध्ये उपस्थित राहिल्या नाहीत.

त्यामुळे खऱ्या अर्थाने राजमाता मासाहेब जिजाऊ यांच्या जयंतीचा जणू या महिला ग्रा पं. सदस्यांना मासाहेब जिजाऊंचा विसर पडला की काय असे हि महिला वर्गामध्ये व ग्रामस्थांमध्ये बोलल्या जात आहे एवढे मात्र खरे...

# जलंब ग्रा.पं.च्या वतीने ठाणेदार धीरज बांडे यांचा सत्कार



देशोन्नती वृत्तसंकलन...

**जलंब** ■ पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार धीरज बांडे यांची येथून खामगाव येथे बदली झाली त्यानिमित्त त्यांचा जलंब ग्रा.प कार्यालयामध्ये सरपंच व ग्रा.प सदस्य यांच्यावतीने ठाणेदार धीरज बांडे यांचा शाल श्रीफळ व श्री संत गजानन महाराज यांचा फोटो देऊन सत्कार करण्यात आला. देशमुख, सुरेश देवचे, गणेश देवचे, सचिन सोनटक्के, संदीप सोनटक्के, राजेश गव्हांदे, किशोर साबळे आदीसह ग्रामस्थ मंडळी उपस्थित होती.

यावेळी निरोप समारंभाच्या कार्यक्रमात सत्काराला उत्तर देताना ठाणेदार धीरज बांडे यांनी आपल्या २ वर्षाच्या कार्यकाळातील अनेक गोष्टींना उजाळा देऊन आपले

# ग्रामपंचायत कार्यालय, जलंब

लोकमत

लोकमत न्यूज नेटवर्क

**जलंब :** ग्रामपंचायत कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे सरपंच मंगला घोपे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी संजय गव्हांदे, सुरेश गव्हांदे, महादेव सोनटक्के, उत्तम घोपे आदींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला उपसरपंच महेश गव्हांदे,



सदस्य संजय गव्हांदे, प्रकाश देवचे, गोपाल मोहे, सचिन असंबे, दुर्गा गव्हांदे, वैशाली हेलोडे, पल्लवी सोनटक्के, ग्रामविकास अधिकारी सुभाष काळे यांच्यासह ग्रा. पं कर्मचारी व ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

देशोन्नती

# जलंब येथे ५ ४ लाख रूपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन संपन्न

## वित्त आयोगाच्या निधीमधून ग्रामीण भागाचा विकास होवू शकतो- गटविकास अधिकारी सतिष देशमुख



देशोन्नती वृत्तसंकलन...

जलंब ■ शासनाने ठरवून दिलेल्या वित्त आयोगाच्या निधीचे कृती आराखड्यानुसार योग्य नियोजन करून ग्रा.पं.ने काम केल्यास या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास होतो व या निधीचा जलंब येथील ग्रामपंचायत प्रशासनाने योग्य नियोजन केल्यामुळे आपल्या ग्रामपंचायत चा जिल्ह्यामध्ये अतिशय चांगला नावलौकिक आहे असे प्रतिपादन शेगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सतीश देशमुख यांनी जलंब येथील ५४ लाख रुपयांच्या विविध विकास कामाच्या भूमिपूजन समारंभ प्रसंगी बोलतांना केले आहे.

जलंब येथे मागासवर्गीय विकास व १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत ५३ लाख ८४ हजार ५०० रुपयांच्या विविध विकास कामाचा मध्य भूमिपूजन समारंभ दि.९ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ११ वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

या भूमिपूजन समारंभाच्या अध्यक्षस्थानी ग्रा.प.च्या कर्तव्यदक्ष सरपंच सौ. मंगलाताई उत्तम घोपे ह्या होत्या तर कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणून माजी सरपंच नानाभाऊ गव्हांदे, माजी प.स. सदस्य विठ्ठल सोनटक्के हे होते तर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून शेगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सतीश देशमुख, खामगाव येथील उपविभागीय अभियंता [illegible]

सहाय्यक गट विकास अधिकारी बी डब्ल्यू चव्हाण, विस्तार अधिकारी रोकडे, ग्राम विकास अधिकारी सुभाष काळे आदी मान्यवर मंचकावर उपस्थित होते.

आज पार पडलेल्या भूमिपूजन सोहळ्यामध्ये जलंब गावामध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पाण्याची वाढीव टाकी, भीम नगर, बामनदादा कर्डक नगर, पंचशील नगर मध्ये दलित वस्ती निधी अंतर्गत सिमेंट रस्त्याचे काम करणे, वार्ड क्रमांक २ मध्ये भूमिगत नाली पाईपलाईन करणे, गावातील नाल्या दुरुस्ती करणे, स्मशानभूमी रस्त्यावर व श्री पाई विद्यालय रस्त्यावर ट्रीट लाईट लावणे, वीरेंद्र राजपूत ते रतन सिंग राजपूत [illegible] लाईन टाकणे आधी विविध विकास कामाचा समावेश आहे.

या कार्यक्रमाला सरपंच सौ. मंगलाताई घोपे, उपसरपंच महेश गव्हांदे, ग्रा.प सदस्य संजय गव्हांदे, प्रकाश देवचे, गोपाल मोहे,सौ. दुर्गा गव्हांदे,सौ. वैशाली हेलोडे,सौ. पल्लवी सोनटक्के आदी सह महादेव सोनटक्के, रामभाऊ धामणकार, बाळकृष्ण मोहे, रामेश्वर मोहे, डॉ. आर के राजपूत, सरपंच पती उत्तम घोपे, सुरेश गव्हांदे, गजानन असंबे, प्रभाकर दुटे, अशोक मापकर, समाधान फाळके, सतीश सोनटक्के, संजय राजपूत, हरिओम तायडे, सरदार टेलर, सुनील हेलोडे, विजय चोपडे, संजय वानखडे, प्रमोद गव्हांदे, राजू [illegible] श्रीनाथ, मनोज गव्हांदे, विशाल घोपे, ज्ञानेश्वर डांगे, संदीप सोनटक्के, सचिन सोनटक्के, केशव देशमुख, गणेश देवचे, सुरेश देवचे, राजेश गव्हांदे व ग्रामस्थ मंडळी बहु संख्येने उपस्थित होती.

याप्रसंगी भूमिपूजन सोहळ्याला उपस्थित राहणाऱ्या सर्व मान्यवरांचा ग्रामपंचायत च्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपविभागीय अभियंता पाचपोर, सहाय्यक गटविकास अधिकारी चव्हाण, संजय गव्हांदे आदींनी बहुमोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल काळे तर आभार प्रदर्शन विठ्ठल सोनटक्के यांनी केले.

Deshonnati Edition
Feb 10, 2023 Page No. 7
Powered by : eReleGo.com

# जलंब ग्रामपंचायत च्या वतीने ग्रामस्थांना शुध्द व थंड पाणी मिळण्यासाठी सुरू केला आरो प्लॅंट..

## सरपंच सौ.मंगलाताई घोपे यांच्या पुढाकाराने



दिव्य मातृछाया
सुरज देशमुख

जलंब : येथील ग्रामपंचायतच्या वतीने गावातील नागरिकांना शुध्द व थंड पाणी मिळण्यासाठी ग्रामपंचायतच्या कर्तव्यदक्ष सरपंच सौ.मंगलाताई उत्तम घोपे यांनी पुढाकार घेऊन गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर ग्रामपंचायत कार्यलयाच्या बाजूला आरो प्लॅंट सुरू करण्यात आला आहे. तर सदर आरो प्लॅंट चे उद्‌घाटन सरपंच सौ.मंगलाताई घोपे यांच्या हस्ते विधिवत पुजन करून करण्यात आले. या प्रसंगी उपसरपंच सौ पल्लवी सोनटक्के, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश देवचे, संजय गव्हांदे, महेश गव्हांदे, सचिन असंबे,सौ. दुर्गा गव्हांदे, सौ.वैशाली हेलोडे, . सौ.पुजा काळे,सौ.गिताबाई दुटे , ग्रामविकास अधिकारी सुभाष काळे, सरपंच पती उत्तम घोपे, गणेश लागे, गणेश देवचे, शिवहरी देवचे, सुरेश देवचे, सचिन सोनटक्के, केशव देशमुख आदींसह ग्रामस्थ मंडळी उपस्थित होती.

तरी गावातील ग्रामस्थांनी शुध्द पाणी मिळण्यासाठी सदर आरो प्लॅंट चा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन हि सरपंच सौ.मंगलाताई घोपे यांनी केले आहे.

# लोकसहभागातून पालटले जलंब स्मशानभूमीचे रूपडे

## इतर गावांसाठी आदर्श : ग्रामस्थांवरच स्वच्छतेची जबाबदारी

**शेगाव, ता.७ :** स्मशानभूमी मधील समस्या सर्वच खेड्यांमध्ये सारख्याच पाहायला मिळतात. तीच परिस्थिती काही वर्षा आधी जलंब स्मशानभूमीची होती. परंतु, या सर्व अडचणींवर मात करत ग्रामस्थांनी लोकसहभागातून या स्मशानभुमीचे रुपडे पालटले आहे.

बहुतांश गावात स्मशानभूमीमध्ये सुधारणा करण्याकरीता श्रम करण्याची मानसिक तयारी बहुधा आढळून येत नाही. कारण या कार्यात आर्थिक फायदा नसतो. तरी पण कोविड- १९ च्या लॉकडाऊन काळामध्ये गावातील सेवानिवृत्त शिक्षक महादेव सुगदेवराव



**शेगाव : जलंब स्मशानभुमीचा स्वच्छ, सुंदर परिसर.**

सोनटक्के, रामभाऊ गोविंदा धामणकर यांनी ही जबाबदारी स्वीकारली व कार्याला सुरुवात केली. यामध्ये जलंब येथील गोपाळराव देशमुख गुरुजी यांचे निधन झाले येथूनच आर्थिक तरतुदीची सुरुवात झाली. आणि प्रत्येक दहनाच्या वेळी झोळी फिरवून पैसे गोळा करण्याला सरुवात झाली. धामणकर गुरुजी व सोनटक्के गुरुजी यांच्या नावाने बँकेमध्ये जॉईंट अकाऊंट काढण्यात आले. प्रत्येक वेळी झोळीत जमा झालेले पैसे बँकेत जमा करण्यात येत होते. अशा रीतीने एप्रिल २०२० पर्यंत बँकेत ८०,००० रु जमा झाले. यातून मग सुधारणांना सुरुवात झाली.

स्मशानभूमी मधील सुधारणा करण्याकरीता सतीश शरद सोनटक्के, संजय सोनसिंग राजपुत, अरुण समाधान काळे, मंगेश ज्ञानेश्वर डवले, उत्तम ज्ञानदेव घोपे, संतोष धामणकार अमोल जउळकार, निंबाजी कोठाळे, संतोष वानेरे, महादेव असंबे, गणेश उकरडे, निवृत्ती मोहे, संदिप सोनटक्के यांनी स्मशानभूमी मध्ये एक पक्की रूम बांधली. तर जलंबच्या सरपंच मंगला उत्तम घोपे यांचे पती उत्तम

> **ग्राम सुधारणेसाठी लोकसहभाग खुप महत्वाचा असतो. कोणताही एक व्यक्ती बदल घडवू शकत नाही. जलंब येथील ग्रामस्थ अत्यंत जागृक असून, कोणत्याही ग्रामविकासाच्या कामात हिरीरीने आपला सहभाग नोंदवतात. जलंब येथील स्मशानभूमीचे बदलले चित्र हे त्याचेच एक उदाहरण आहे.**
> **- मंगला उत्तम घोपे**, सरपंच, जलंब.

ज्ञानदेव घोपे यांनी स्मशानभूमीमध्ये आराखडा तयार करून स्वत: स्वखर्चाने चारही बाजूला मेहंदी, अशोकाची झाडे व इतर शोभेची झाडे देऊन वृक्षारोपण केले.

स्मशानभुमीचे बदलते चित्र पाहून गावातील अनेकांनी सढळ हाताने मदत करणे सुरु केले. त्यामुळेच स्मशानभूमीमध्ये एक नवीन शेड, पं.स. सदस्य विठ्ठल सोनटक्के यांच्या निधीमधून एक शौचालय, माजी सरपंच संतोष पळसकार यांच्या आईच्या स्मृती प्रीत्यर्थ स्मशानभूमीला आकर्षक असे प्रवेशद्वार बनवून दिले. तर देखण्या झालेल्या स्मशानभुमीच्या स्वच्छतेसाठी कार्यकारीणी अध्यक्ष, सचिव, व सर्व सदस्य श्रमदान करतात व स्मशानभूमीची निगा राखतात. त्यामुळे लोकसभागातून बदललेल्या जलंब येथील स्मशानभुमी तालुक्यातील इतर गावांसाठी एक आदर्श उदाहरण बनली आहे.

# जलंब गावामध्ये ग्रामपंचायतच्यावतीने चौका-चौकात लावले हाय मास्ट लाईट

**जलंब ■** येथील ग्रामपंचायत च्या सामान्य निधीतून जलंब गावामध्ये प्रत्येक चौका- चौकात ग्रामपंचायत सरपंच सौ.मंगलाताई उत्तम घोपे यांनी पुढाकार घेऊन गावातील जनतेच्या सोई सुविधेसाठी हॉय मारट लाईट लावण्यात आले आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळी



शहरा प्रमाणेच जलंब गावांमध्ये सुद्धा शहरा प्रमाणे सर्वत्र चमकत आहे.

येथील रेल्वे रटेशन, झोपडपट्टी, गावातील बसस्थानक, आठवळी बाजार चौक, ग्रामपंचायत परिसर, सेंट्रल बँक, भिम नगर, शिवाजी चौक, दुर्गा चौक, वंदेमातरम चौक, खुमकर गल्ली, स्मशानभूमी रोड, राजपुत गल्ली,

## जलंब ग्राम पंचायतचा आदर्श उपक्रम

# घर व पाणी कर भरणाऱ्यांना दिल्या मोफत आरो कॅन



देशोन्नती वृत्तसंकलन...

**जलंब ■** येथील ग्रामपंचायत चा सन २०२३ पर्यंतचा संपूर्ण घर कर व पाणी कर भरणाऱ्या ग्रामस्थांना ग्रामपंचायत च्या वतीने सरपंच सौ मंगलाताई घोपे यांच्याहस्ते १९ ऑक्टोंबर रोजी, सकाळी ग्रा. प.

आपल्याकडील असलेला संपूर्ण कराचा भरणा केला आहे अशा सर्व ग्रामस्थांना येथील ग्रामपंचायतच्या वतीने एक मोफत आरो कॅन देऊन एक आदर्श उपक्रम राबविला आहे. येथील ग्रा. प. ने राबवलेल्या या उपक्रमाचे गावकऱ्यांनी स्वागत केले आहे.

सकाळ



देशोन्नती

## महिला - सांस्कृतिक

# विद्यार्थ्यींनींना मोफत सायकलचे वाटप

देशोन्नती वृत्तसंकलन...

जलंब ■ येथील ग्रामपंचायतच्या वतीने १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून १५ येथील गरिब कुटुंबातील शाळकरी विद्यार्थीनींना अक्षरा गव्हांदे, प्रतिक्षा गव्हांदे, सोनाली इंगळे, कुंजन गवई, नेहा मोहे, जया बोरसे, गौरी सुमरे, वनश्री अव्वार, ऋतुजा सोनटक्के, सुपेक्षा वानखडे, दिव्या जाधे, लक्ष्मी देवचे, गौरी देशमुख, अवंती देशमुख, आस्था देशमुख इत्यादी विद्यार्थीनींना सायकलचे वितरण करण्यात आले.

सदर कार्यक्रमाला सरपंच सौ. मंगला घोपे, सौ. दुर्गा गव्हांदे, प्रकाश देवचे, महेश गव्हांदे, सुरेश गव्हांदे, सरपंच पती उत्तम घोपे, ग्रामविकास अधिकारी सुभाष काळे यांच्यासह सर्व ग्रा.प.सदस्यगण, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ मंडळी उपस्थित होती. (वार्ताहर)



शाळकरी मुलींना ग्रा.प.सरपंच सौ.मंगला घोपे यांच्या हस्ते ग्रा.प.कार्यालयामध्ये मोफत सायकलचे वाटप करण्यात आले.

# जलंब ग्रा.पं. च्या वतीने दिव्यांग बांधवांना मोफत संसार उपयोगी साहित्याचे वाटप



देशोन्नती वृत्तसंकलन...

जलंब ■ स्थानिक ग्रामपंचायतच्या वतीने ५ टक्के सामान्य निधीमधून गावातील १० दिव्यांग (अपंग) बांधवांना २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता सरपंच सौ. मंगलाताई घोपे यांच्या उपस्थितीत मोफत संसारउपयोगी साहित्याचे वाटप ग्रा. पं. कार्यालयामध्ये करण्यात आले.

यावेळी रंजना मार्कंड, रामकृष्ण सूर्यवंशी, इब्राहिम शहा, बाळू काळे, प्रभाकर मेहरे, कलावती गव्हांदे, दुर्गाबाई पारे, श्रीकृष्ण डाबेकर, तुकाराम कोसळे, दिपक मोरे आदी १० दिव्यांग बांधवांना संसार उपयोगी साहित्य (भांड्यांचा संच) वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला सरपंच सौ. मंगला घोपे, उपसरपंच सौ. पल्लवी सोनटक्के, ग्रामविकास अधिकारी सुभाष काळे, ग्रा. पं. सदस्य सौ. दुर्गा गव्हांदे, सौ. पूजा काळे, सौ. निता दुटे, प्रकाश देवचे, संजय गव्हांदे, महेश गव्हांदे, गोपाल मोहे, सरपंचपती उत्तम घोपे, गुलाब मोरे आदींसह ग्रा. पं. कर्मचारी, ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते. यापुढे उर्वरीत गावातील दिव्यांग अपंग बांधवांना देखील टप्प्याटप्प्याने साहित्याचे वाटप करण्यात येणार असल्याचे सरपंच सौ. मंगला घोपे यांनी सांगितले आहे.

(वार्ताहर)

# निराधार दिव्यांगांना वस्तुचे वाटप

देशोन्नती वृत्तसंकलन...



जलंब ■ वाढदिवसाचा बडेजाव न करता सगळ्या गोष्टींना फाटा देत ठाणेदार धीरज बांडे यांनी आपल्या वाढदिवस थेट निराधार दिव्यांग बांधवासोबत साजरा करून चेहऱ्यावर हास्य फुलविले. सावली सेवा प्रकल्पातील दिव्यांग बांधवांना आवश्यक ब्लँकेट व सतरंजीचे वाटप करण्यात आले. जलंब पोलिस स्टेशनचे ठाणेदार धीरज बांडे यांचा ५ फेब्रुवारी रोजी वाढदिवस. त्यांनी शेगाव तालुक्यातील सावली सेवा प्रकल्प येथील निराधार दिव्यांग बांधवासोबत साजरा केला. यावेळी ठाणेदार धीरज बांडे व त्यांच्या पत्नी वैष्णवी बांडे यांच्या हस्ते केक कापून दिव्यांग बांधवांना केक भरविण्यात आला. यावेळी सावली सेवा प्रकल्पाचे प्रशांत देशमुख, दिव्यांग बांधव ज्ञानेश्वर अंजनकर, मुक्ता अंजनकर, संजय वहाकर, दुर्गा वहाकर, ज्ञानेश्वर मामोदरे, शंकर अगमकर, पंढरीनाथ शिंदे, धनराज पाटील यांच्यासह अनिता हिरळकर, एएसआय संदीप शिंदे, मुरलीधर बोरसे, पोहेका गोविंद सोनमाने, संजय पहूरकर, राजेश राजगुरे, गोपाळ सोनवणे, संदीप गावंडे, अमोल कवडे यांच्यासह जलंब पोलिस स्टेशनचे कर्मचारी उपस्थित होते. (वार्ताहर)

लोकमत

# जलंब येथील जि. प. शाळेला चार ई-लर्निंग संच भेट



लोकमत न्यूज नेटवर्क

